माहितीपुस्तिका

एकल महिलांसाठी कसे काम करावे ?

(महिलांसाठीच्या सर्व. योजनांच्या उपयुक्त माहितीसह)

मिलिंदकुमार साळवे

हेरंब कुलकर्णी

साऊ एकल महिला समिती महाराष्ट्र

ज्या कार्यकर्त्यांना एकल महिलांसाठी काम करायचे आहे ?ते काम कसे करावे ? त्यांच्यासाठी ही पुस्तिका आहे.

एकल महिलांसाठी कसे काम करावे ?

तुम्ही सर्वजण एकल महिलांसाठी काम करू इच्छिता याने मनस्वी आनंद वाटला.आपण सर्वजण एकत्र काम करू या. तुमच्यापैकी अनेकजण यापूर्वी काम करत आहेत किंवा अनेकजणांनी पूर्वी केले नसेल पण इच्छा आहे. त्यामुळे हे काम कसे करावे ? याविषयी सविस्तर माहिती देतो आहे.

एकल महिला कोण ?

एकल महिला म्हणजे विधवा घटस्फोटित व परित्यक्ता व स्वेच्छेने अविवाहित राहिलेल्या महिला अंदाजे संख्या अहिल्यानगर जिल्ह्यात या महिलांचे ग्रामपंचायत क्षेत्रात फक्त गावपातळीवर सर्वेक्षण केल्यावर ही संख्या १ लाख ५ हजार भरली. यात नगर पंचायत, नगरपालिका , महापालिका अशी संख्या एकत्र केल्यास ती २ लाख असू शकते. एका जिल्ह्यात इतकी असेल तर ३६ जिल्हे आणि महाराष्ट्रातील मुंबई पुणे सारखी मोठी शहरे बघता **ही संख्या ७५ लाखापेक्षा नक्कीच जास्त असू शकते.**

एकल महिला समस्या: काय आहेत ?

१) या महिलांचे एकटेपण हीच समस्या आहे. त्यातून अनेक प्रश्न असतात. सासरी अनेक विधवा महिलांचा सांभाळ न करणे व माहेरून आधार नसणे असे प्रश्न तर घटस्फोट घेतलेल्या व परित्यक्ता महिलांना नव्याने आयुष्य सुरू करणे ही समस्या असते

२) या महिलांकडे आवश्यक कागदपत्रे नसतात. सासरच्या रेशनकार्ड मध्ये नाव असल्याने स्वतंत्र रेशनकार्ड नसणे, बँकेत खाते इथपासून संजय गांधी निराधार, बालसंगोपन व इतर योजनांची माहिती नसल्याने लाभ मिळण्यात अडचणी

३) रोजगार हेच खरे पुनर्वसन आहे परंतु या महिलांचे फार रोजगार सुरू होत नाहीत. रोजगाराची मानसिकता तयार होण्याचे प्रयत्न न होणे, भांडवल नसणे, कर्जासाठी तारण नसणे, बँकांना कर्ज वाटपाला मर्यादा असणे, व्यवसाय प्रशिक्षण नसणे व सर्वात महत्वाचे म्हणजे तयार केलेल्या

मालाचे मार्केटिंग करता न येणे यामुळे महिलांचे व्यवसाय सुरू होऊ शकत नाहीत.

४) सासरच्या कुटुंबातील मालमत्तेत असलेला वाटा या महिलांना मिळण्यात अडचणी येतात. अनेकदा या महिलांना घराबाहेर काढले जाते. जमीन वाटप करत नाहीत.दुकान असेल तर वाटा दिला जात नाही. या महिलांना वारस नोंदी कशा कराव्यात ? याची माहिती नसते. त्यातून मालमत्ता मिळत नाही. माहेरच्या मालमत्तेत ही वाटा मिळण्यात अशाच अडचणी येतात.

५) सासरचे घर सोडल्यावर राहण्याची समस्या असते.घरकुल यादीत नाव नसते किंवा प्राधान्यक्रम नसतो. कधी स्वतः ची जागा नसते..

६) अनेक महिलांची पुनर्विवाह करण्याची इच्छा असते, वय ही कमी असते पण कमी वयात लग्न झाल्याने शाळेत जाणाऱ्या वयाची मुले असतात. त्यामुळे मुले असताना लग्न करणे योग्य नाही असे तिला ऐकवले जाते व पुरुष ही अशा महिलांशी मुले असल्यामुळे लग्न करायला तयार होत नाहीत. मुले माहेरी ठेवण्याचा आग्रह धरतात व महिला त्याला तयार होत नाहीत.

७) या महिलांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न गंभीर असतो कारण १० वी नंतर खाजगी शिक्षण संस्थेतील शिक्षण त्या मुलांना देताना खूप अडचण येते

८) या महिलांच्या मुलींचे लवकर जबाबदारी कमी करावी म्हणून बालविवाह करण्याकडे त्यांचा कल असतो.

९) पुरुष प्रधान परंपरेत महिलांना दुय्यम स्थान. विधवा म्हणून परंपरेत त्रास दिला जातो.

एकल महिलांसाठी काम करण्याचे टप्पे

एकल महिला कशा जोडाव्यात ?

सर्वप्रथम आपण शहरात असाल तर कोणत्या परिसरात किती वार्डात काम करणार हे ठरवावे तर ग्रामीण भागात असाल तर किती गावात काम करणार आहोत ते नक्की करावे.

१)निवडलेल्या परिसरातील किंवा गावातील सर्व प्रथम एकल महिला म्हणजे कोण ? विधवा महिला, घटस्फोटित महिला, परित्यक्ता आणि अविवाहित राहिलेल्या महिला यांना एकल महिला आपण म्हणतो. या महिला शोधून जोडून घेणं ही पहिली पायरी आहे.

त्यासाठी एक WhatsApp मेसेज परिचयाच्या सर्व ग्रुपवर टाकावा.ग्रुपसोबत आपण सर्व व्यक्तिगत क्रमांकावर हा मेसेज टाकावा. मेसेज असा असावा.

एकल भगिनींना आवाहन

आपल्या परिसरातील सर्व एकल महिलांसाठी आम्ही काम करतो आहोत. या परिसरातील सर्व विधवा,घटस्फोटीत,परित्यक्ता भगिनींसाठी साऊ एकल महिला समिती काम करणार आहे. या महिलांचे प्रश्न सोडविणे, त्यांना शासकीय कागदपत्रे, लाभ मिळवून देणे, योजना मिळवून देणे यासाठी संस्था काम करणार आहे. त्याचबरोबर या महिलांना विविध व्यवसाय उपलब्ध व्हावेत यासाठी प्रयत्न करणार आहे. या महिलांच्या पाठीशी उभे राहण्यासाठी साऊ एकल महिला समिती राज्यभर काम करत आहे. यासाठी अशा एकल महिलांनी संपर्क करावा.

आपले नम्र

____

संपर्कासाठी पत्ता व मोबाईल no कृपया वरील मेसेज आपल्या परिचयाच्या एकल महिलांना पाठवावा ही विनंती

या मेसेजमुळे मोठ्या संख्येने एकल महिला तुमच्याशी संपर्क करतील.

२) त्यानंतर तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार कार्यालयात विधवा पेन्शन घेणाऱ्या महिलांची यादी मिळवावी. बालसंगोपन योजनेत ज्यांच्या मुलांना लाभ मिळतो ती यादी अंगणवाडी कार्यालयात मिळते. ही यादी आणायला महिलांना पाठवावे म्हणजे लवकर मिळते.

३) अंगणवाडी सेविका ग्रामसेवक यांच्याकडून ही गावपातळीवर काही नावे मिळतील.

तालुक्यातील जास्त नावे आली तरी चालतील पण काम फोकस करून निवडलेल्या गावात काम करावे, इतर महिलांना जमेल तशी मदत करावी

४) त्यानंतर त्या यादीतील ५५ वर्षापेक्षा कमी वयाची महिला अशी यादी करावी. त्या महिलांची डिटेल माहिती घेण्यासाठी एखादा छोटा फॉर्म बनवावा (तो नमुना खाली दिला आहे). संपर्कातील सर्व महिलांना एकत्र करून तो भरून घ्यावा.

५) या महिलांसाठी जर काम करायचे असेल तर किमान ५० तरी महिला आपल्या संपर्कात असायला हव्यात. त्यामुळे एकत्रित काम करता येईल

महिला संपर्काची पद्धत

तुमची नोंदणीकृत संस्था असेल तर संस्थेत असे काम करण्याचा असा ठराव करावा. त्यासाठी एखादी समिती करावी. या महिलांकडून अल्प रकमेची सदस्यता नोंदणी फी घेण्याचा ठराव करावा. एकदा महिला संपर्कात आल्या की त्यांचा फॉर्म भरून घ्यावा. फॉर्म भरलेल्या महिलांचा सदस्यनिधी म्हणून अल्प रक्कम २० रुपये ते ५० रुपये मात्र अशी रक्कम घेतल्यावर संस्थेची पावती द्यावी. जर आपली संस्था रजिस्टर नसेल तर सदस्यता नोंदणी फी घेऊ नये. असे पैसे घेणे नियमबाह्य होईल. अशा महिलांची फक्त नोंदणी करावी अशा महिलांचा WhatsApp ग्रुप बनवावा. अशा सर्व महिलांची एकत्र मिटींग घ्यावी. त्यांच्या अडचणी समजून घ्याव्यात.

जमलेल्या माहिती आधारे -

* रेशन कार्ड नसलेल्या

* संजय गांधी न मिळालेल्या

* बालसंगोपन योजना न मिळालेल्या

* लाडकी बहिण योजना न मिळालेल्या

* इतर कागदपत्र अडचण असलेल्या महिला

मुलांच्या शाळेसंदर्भात असलेल्या अडचणी

अशी यादी करावी व त्याप्रमाणे त्या अडचणी सोडवायला मदत करावी. शक्य झाल्यास काही महिलांच्या घरी भेटी द्याव्यात. त्यातून त्यांची परिस्थिती समजते.

एकल महिलांचा भरून घ्यावयाचा फॉर्म

एकलप्रकार : विधवा/घटस्फोटीत/परित्यक्ता/कुमारी

साऊ एकल महिला समिती

एकल महिला माहिती

नाव : ______________________________ वय : __________

पत्ता (घराजवळची खुण असावी) : ______________________________

मोबाईल no : ______________________________

१८ वर्षाखालील मुलांची संख्या : ______________________________

स्वत:चे घर आहे का ? ______________________________

नसल्यास घर बांधायला जागा आहे का ? ______________________________

सध्या व्यवसाय काय करता ? ______________________________

शेती आहे का ? __________ असल्यास उताऱ्यावर नाव आहे का ? ______________________________

बचत गटात आहात का ? ______________________________

कोणता व्यवसाय करावा वाटतो ? ______________________________

त्यासाठी काय मदत हवी आहे ? ____________________

कोणती शासकीय कागदपत्र आवश्यक असूनही तुमच्याकडे नाहीत ? ____________________

आरोग्यशिबीर

एकल महिलांना शारीरिक व मानसिक आजार असतात. दुःख व तणावात असल्याने त्या स्वत: च्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. तणावाने मानसिक प्रश्न तयार होतात. डिप्रेशन असते. त्यातून चिडचिड वाढते. मुलांकडे दुर्लक्ष होते. त्यामुळे तालुक्यातील किंवा जिल्हास्तरावरील महत्वाचे डॉक्टर बोलावून आरोग्य शिबीर आयोजन करावे. त्यासाठी एखादी पतसंस्था किंवा रोटरी लायन्स,लायन्स क्लब, मेडिकल असोसिएशन यांचे सहकार्य घ्यावे. जया महिलांना समस्या निघतील त्यांना उपचार मिळण्यासाठी मदत मिळवावी. शस्त्रक्रिया आवश्यक असेल तर महात्मा फुले जनआरोग्य अभियान अंतर्गत करावी. महिलांना आयुष्यमान भारतचे कार्ड मिळवून द्यावे.त्यातून या महिलांचा आरोग्याचा प्रश्न सुटू शकेल.

एकल महिलांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न

एकल महिलांच्या प्रश्नांचा विचार करताना त्यांच्या मुलांचे शिक्षणाचा प्रश्न महत्वाचा आहे. शिक्षण चांगले मिळाले तर या महिलेचा पुढील काळ सुखकर असू शकतो. जर या महिलेचे मूल चांगले शिकले नाहीतर मुलगा बालकामगार होऊ शकतो आणि मुलीचा बालविवाह होऊ शकतो.त्यामुळे एकल महिलेच्या मुलाचे आणि मुलीचे शिक्षण चांगले झाले पाहिजे. त्यासाठी आपण काय करू शकतो

१) जून महिन्यात या महिलांच्या मुलांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचा कार्यक्रम करावा. गणवेश द्यावा. या वाटपासाठी देणगीदार बघावे
२) या मुलांची फी शाळेने कमी करावी म्हणून त्या शाळेत विनंती करावी
३) या महिलांच्या मुलींना कोणी त्रास देत असेल तर लक्ष घालावे
४) खाजगी शिकवणी वर्ग लावल्यासाठी मदत करावी
५) जर बालगृहात हे पाल्य तयार असतील तर तशी व्यवस्था करायला मदत करावी
६) अनेकदा वडील नसल्याने हे विद्यार्थी मित्रांच्या संगतीने शाळेकडे दुर्लक्ष करतात.त्यांचे अधून मधून समुपदेशन करायला हवे.

कायदेशीर मदत मिळवून देणे

त्या महिलांमध्ये घटस्फोट केस सुरू असल्यास किंवा इतर कायदेशीर मदत हवी असेल तर त्या महिलांना मोफत कायदेशीर मदत मिळवून देण्याचा प्रयत्न करावा..यासाठी सरकारच्या तरतुदी आहेत याचा लाभ घ्यावा..विधी सेवा समितीकडे जर अर्ज केला तर एकल महिलांना मोफत वकील दिला जातो.त्याच्या मदतीने या महिला कायदेशीर लढा देऊ शकतात.

वारस नोंद करणे

प्रत्येक तालुक्यात विधी सेवा संघ आहेत. त्या संघाचे मार्गदर्शन शिबीर मोफत असते. ते शिबीर आपल्या तालुक्यातील महिलांसाठी आयोजित करायला हवे. त्यातून त्यांना त्यांचे हक्क, वारसा हक्क याविषयी मदत मिळू शकते. वारस नोंद करणे हे सर्वात महत्वाचे असते.त्यासाठी आपण या महिलांना मदत करायला हवी.

विधवा प्रथा निर्मुलन

आपल्या समाजातील विधवा महिलांच्या विषयी असलेल्या परंपरा अतिशय क्रूर व अमानवी आहेत. या प्रथा कशा चुकीच्या आहेत,यावर सतत बोलायला हवे.एकीकडे या महिला अतिशय वेदनेत जगत असतात. त्यांचे जगण्याचे प्रश्न अतिशय तीव्र झालेले असतात आणि दुसरीकडे मात्र या परंपरा त्यांना माणूस म्हणूनही जगू देत नाही. त्यामुळे आपण पुढील गोष्टी करायला हव्यात.

१) एखाद्या महिलेच्या पतीचे निधन झाल्यावर तिचे मंगळसूत्र जोडवे काढणे या प्रथा बंद व्हाव्यात याविषयी सतत बोलायला हवे
२) त्या महिलेने धार्मिक कार्यात येण्याला बंदी न करणे याबाबत सतत बोलावे
३) विधवा महिलांनी दागिने घालणे, चांगले राहणे, आत्मविश्वासाने वावरणे याला प्रोत्साहन द्यावे
४) गणपती आरती, धार्मिक कार्यक्रम महिलांच्या हस्ते करावेत.
५) हळदीकुंकू कार्यक्रम ठेवावे व त्यात सर्व प्रकारच्या महिला बोलावून विधवा महिलांना सहभागी करावे.
६) आजूबाजूच्या ग्रामपंचायतीत विधवा प्रथा आमच्या गावात पाळली जाणार नाही याबाबत ठराव घ्यावेत.

विधवा पुनर्विवाह

लग्न करून दुसरा संसार सुरू करावा हा एक सोपा पर्याय महिलांसमोर असायला हवा परंतु तो पर्याय आता सोपा राहिला नाही.पुरुषाने कितीही वय झाले तरी लग्न करावे पण महिला मात्र लग्नाचा विषय काढला की मुले आता मोठी झाली आता कसे लग्न करतेस असे सर्वच ऐकवले जाते. २० ते ५० या वयोगटातील महिलांची संख्या खूप मोठी असते. यांनी लग्न करायला काहीच हरकत नाही किंबहुना मुले मोठी असणे आणि लग्न करण्याचा काहीच संबंध नाही परंतु मुलांचे वय ही अडचण सातत्याने दाखवून या महिलांना जीवनाची नवीन

सुरुवात करण्यापासून रोखले जाते. मुलाकडचे लोकही,तुझ्या मुलांना माहेरी ठेवून येत असेल तरच लग्न करू अशा अटी घालतात व महिला मुलांना सोडायला तयार होत नाहीत. त्यातून या महिलांचे पुनर्विवाह रखडले आहेत. यासाठी ज्या महिलांना पुनर्विवाह करावेसे वाटतात त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची गरज आहे. तेव्हा या महिलांनी पुन्ह लग्न करावे यासाठी पुरुषांनी न बोलता महिलांना त्यांच्याशी बोलायला सांगावे व इतर महिला त्यांच्याशी बोलतील असा प्रयत्न करावा. पुरुषांनी मात्र त्या महिलेच्या मुलांसह स्वीकार करावा असा आग्रह धरावा. एकल महिलेने असा विवाहाचा निर्णय घेण्यापूर्वी सासर व माहेरची तिची असलेली मालमता नावावर करून मगच असा पुनर्विवाहाचा निर्णय घ्यावा. ज्या महिला असा निर्णय घेत्तील त्यांचा घरी जाऊन सत्कार करावा. त्याला प्रसिद्धी द्यावी ज्यातून इतर महिलांना प्रेरणा मिळू शकेल. आपल्या एकल महिला समितीच्या सदस्यांनी आजपर्यंत ३० पेक्षा जास्त पुनर्विवाह घडवून आले आहेत.

रोजगारासाठी प्रयत्न

रोजगार हा सर्वात महत्वाचा मुद्दा आहे.रोजगार हेच खरे महिलांचे पुनर्वसन आहे. त्यासाठी महिलांना रोजगार करण्यासाठी प्रोत्साहन देण्याची गरज आहे.त्यासाठी संपर्कातील महिलांना कोणता व्यवसाय करायचा आहे ही माहिती घ्यावी. जर त्या रोजगार करण्याला तयार नसतील तर त्यांच्यासाठी रोजगार मार्गदर्शक व्याख्याने ठेवावीत..ज्या महिला रोजगार करायला तयार होतील त्या महिलांना बँक कर्ज प्रकरणे करायला मदत करावी..मार्केटिंग चे मार्गदर्शन करावे. त्यासाठी सर्व बँकेत जाऊन कर्ज योजना समजून घ्याव्यात...रोजगार विषयक youtube video बघावेत.

रोजगार कोणकोणते असू शकतात त्याची यादी आपण मागे दिली आहे. रोजगाराची एक पूर्व अट म्हणून या सर्व महिलांनी बचत गटात सहभागी होणे आवश्यक आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या , उमेद च्या अनेक योजना आहेत. त्या योजना उपयुक्त आहेत. त्या योजनांचा लाभ बचत गट सदस्य जर त्या झाल्या तरच मिळू शकेल. सातत्याने विविध प्रशिक्षणांचे आयोजन करणे, मार्केटिंग चे ज्ञान देणे व विविध यशस्वी उद्योग प्रत्यक्षात जाऊन बघणे यातूनच या महिला उद्योजक होऊ शकतील. त्यामुळे आपल्या कामातील सर्वात महत्वाचा भाग हा रोजगार आहे. जितक्या महिला जास्तीत जास्त उद्योजक होतील तितके आपले काम जास्त महत्वाचे आहे हे लक्षात घ्यावे.

या महिलांसोबत करावयाचे कार्यक्रम

- ३ जानेवारी - सावित्रीबाई फुले जयंती
- १४ जानेवारी ते २० - जानेवारी संक्रांत हळदीकुंकू
- ८ मार्च - महिला दिन
- ११ जून ते १३ जून - शैक्षणिक साहित्य वाटप रक्षाबंधन
- दिवाळीनिमित्त किराणा वाटप कार्यक्रम

वरील कार्यक्रमात भाषण फार न घेता महिलांच्या स्पर्धा घ्याव्यात, त्यांच्या अभिव्यक्तीला संधी द्यावी.मनोरंजन कार्यक्रम ठेवावेत. दिवाळी किराणा व शैक्षणिक साहित्य यासाठी प्रायोजक बघावेत. रक्षाबंधनसाठी महिलांना एकत्र करून प्रमुख नेते नागरिक यांना निमंत्रित करावे. वरील सर्व कार्यक्रमांचा हेतू हा समाजाला या प्रश्नाशी जोडणे हा असला पाहिजे

साधारणपणे अशा स्वरूपाचे काम करायचे आहे...एकदम होणार नाही पण सुरुवात करावी वरील प्रमाणे.

महिलांकडे कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत ?

महिलांना कोणतेही कर्ज घेण्यासाठी इतर शासकीय कामकाजासाठी तसेच वेगवेगळ्य शासकीय/ निमशासकीय महामंडळे व इतर सामाजिक, स्वयंसेवी संस्था यांच्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध लाभाच्या योजना व इतर कामासाठी वैयक्तिक ओळखीचा पुरावा, पत्ता पुरावा, आणि उत्पन्नाचा पुरावा असणे आवश्यक असते. यासाठी खालील कागदपत्रे उपयुक्त ठरतात:

- आधार कार्ड, तहसीलदारांचा रहिवासी दाखला,उत्पन्न प्रमाणपत्र, गरज असल्यास जातीचा दाखला, वारस प्रमाणपत्र, मालमत्ता पत्रिका, सातबारा उतारा, पॅन कार्ड*, *स्वतःच्या नावाचे चालू वीज बिल, असल्यास आयकर विवरणपत्र, मागणीनुसार बँक खाते उतारा, जन्म प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, पिवळी किंवा केशरी शिधापत्रिका (रेशनकार्ड), बँक पासबुक*
- सेतू, सायबर कॅफे, महा ई सेवा केंद्र, नागरी सुविधा केंद्र, ग्रामपंचायतीच्या आपलं सरकार केंद्राद्वारे सर्व प्रकारचे शासकीय दाखले, प्रमाणपत्रे ठराविक शुल्क भरून मिळविता येतात.
- आधार कार्ड: केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ मिळवण्यासाठी लाभार्थ्यांची ओळख पटविण्यासाठी आधार कार्ड हा महत्त्वाचा पुरावा, दस्तऐवज मानला जातो.

- आवश्यक कागदपत्रे : आधार कार्ड काढण्यासाठी जवळच्या पोस्ट किंवा तहसील कार्यालयात केंद्र असतात. यासाठी जन्म प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला, शिधापत्रिका, छायाचित्रे, तलाठी, तहसीलदार, ग्रामपंचायतीचा रहिवासी दाखला अशी कागदपत्रे लागतात.
- अर्ज कुठे करावा : आधार केंद्र, सेतू केंद्र, आपले सरकार केंद्र, महाऑनलाईन महा-ई-सेवा केंद्र ग्रामपंचायत कार्यालय.

बँकेत बचत खाते उघडणे:

अर्ज कुठे कराल: कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँक अथवा जवळच्या पोस्टात. सध्या कोणत्याही कार्यालयात न जाता सेतू, सायबर कॅफे किंवा घरगुती संगणक, मोबाईलवरून देखील पोस्ट, बँकेचे खाते उघडण्याची ऑनलाईन सुविधा सुरू झालेली आहे. शक्यतो जनधन खाते उघडल्यास खात्यात पैसे शिल्लक ठेवण्याची मर्यादा नसते. याला झिरो बॅलन्स खाते म्हणतात.

आवश्यक कागदपत्रे : आधार कार्ड, पॅनकार्ड , रहिवासी दाखला, शिधापत्रिका, ग्रामपंचायत किंवा नगरसेवकाचे शिफारस-ओळखपत्र, पासपोर्ट आकाराची छायाचित्रे.

बँक खाते आधार सिडिंग आवश्यक : सरकारी योजनांच्या लाभासाठी कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेत किंवा पोस्टात बचत खाते असणे आवश्यक असते.

लाभाच्या योजनेसाठी बँक खाते आधारसिडिंग आवश्यक असते. आधार लिंक व आधार सिडिंग करणे यात फरक आहे. आधार क्रमांक व मोबाईल क्रमांक बँक खात्याशी जोडणे म्हणजे आधार लिंक करणे होय. हीच प्रक्रिया के.वाय.सी.साठी वापरली जाते.

विविध शासकीय योजनांचा थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) करण्यासाठी एकाच बँक खात्याचा वापर केला जातो. त्यासाठी कोणत्याही एका राष्ट्रीयीकृत बँकेत, पोस्टात उघडलेले खाते आधार सिडिंग करून घ्यावे लागते. बँकेत जाऊन अधिकाऱ्यांना तशी विनंती केल्यास ते आपले बँक खाते आधार सिडिंग करून देतात. काही बँकामध्ये यासाठी स्वतंत्र अर्ज भरून घेतला जातो. पोस्ट कार्यालयात एक ते दोन तासात नवीन बचत खाते उघडून ते लगेच आधार सिडिंग करून दिले जाते. एका वेळेस कोणतेही एकच बँक अथवा पोस्ट बचत खाते आधार सिडिंग केले जाते. एकाच खातेदाराचे सर्व खाते आधार लिंक होऊ शकतात. मात्र आधार सिडिंग एकच खाते होते.

थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) प्रणाली

या प्रणालीत केंद्र किंवा राज्य सरकारकडून दिले जाणारे सरकारी अनुदान लाभधारकाच्या बँक खात्यात थेट जमा करण्याची संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्यानुसार शासकीय योजनेचे अनुदान लाभधारकाच्या थेट बँक खात्यामध्ये जमा करण्याची डीबीटी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अनुदान देण्यातील भ्रष्टाचार व अनुदान, लाभ जमा होताना होणाऱ्या विलंबास आळा घालणे हे उद्दिष्ट साध्य केले जात आहे. यामुळे आर्थिक व्यवस्थेत दलाल, एजंटांपासून दूर राहून वेळेत व लाभार्थ्यांच्याच बँक खात्यात पैसे जमा होण्याची खात्री निर्माण होत आहे.

आधार सिडिंग असलेल्या खात्यामध्येच केंद्र व राज्य सरकारच्या विविध प्रकारच्या योजनांचा थेट लाभ जमा केला जाते. डिबीटी प्रणाली वापरून थेट लाभ हस्तांतरण करण्यासाठी आधार सिडिंग खाते महत्त्वाचे असते. लाभार्थ्यांची ओळख निश्चित करून पात्र लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट बचत खात्यातच लाभ जमा झाल्याची खात्री देण्यासाठी ही पारदर्शी प्रक्रिया मानली जाते.

परित्यक्ता प्रमाणपत्र : विवाहित पण सासरी नांदत नसलेल्या कायदेशीर घटस्फोट न झालेल्या तसेच लग्न न झालेल्या (कुमारी) महिला परित्यक्ता समजल्या जातात.

परित्यक्ता प्रमाणपत्र तलाठी, शहरी भागासाठी नगरपालिका मुख्याधिकारी/उपमुख्याधिकारी किंवा नगरपालिका कर निरीक्षक देतात.

अर्ज कुठे कराल : तलाठी, महा-ई-सेवा केंद्र, ग्रामपंचायत कार्यालयातील आपले सरकार केंद्र, तहसील कार्यालय,शहरी भागात नगरपालिका.

शिधापत्रिका (रेशनकार्ड) :

नवीन शिधापत्रिका काढण्यासाठी आवश्यक कागदपत्रांसह सेतू केंद्रातून ऑनलाईन अर्ज करावा. कोणत्याही शिधापत्रिकेसाठी आधार कार्ड, तहसीलदारांचे रहिवासी प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला आवश्यक आहे. दोन छायाचित्रे, स्वस्त धान्य दुकानदाराचे शिधापत्रिका नसल्याचे प्रमाणपत्र. शिधापत्रिका मिळाल्यानंतर ती तात्काळ बारा अंकी क्रमांक मिळवून ऑनलाईन करणे आवश्यक आहे. ऑनलाईन नसल्यास धान्य मिळत नाही. सलग तीन महिने धान्य, शिधा न घेतल्यास शिधापत्रिकाधारकास सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधून मिळणाऱ्या धान्याची आवश्यकता नाही, असे समजून त्याचा लाभ बंद होऊ शकतो. त्यामुळे वेळेवर शिधापत्रिकेद्वारे मिळणाऱ्या धान्याचा लाभ घेणे आवश्यक आहे. शिधापत्रिकेच्या समस्येबाबत तहसीलमधील पुरवठा विभागात तक्रार, पाठपुरावा करावा.

वन नेशन, वन रेशनकार्ड म्हणजे देशातील कोणत्याही भागात एकच शिधापत्रिका वापरता येऊ शकते. अधिक माहितीसाठी :

A) https://pmmodiyojna.in/one-nation-ration-card/

B) https://mahafood.gov.in

टोलफ्री क्र.: 1800224950/1967. वन नेशन, वन रेशनसाठी 14445.यावर संपर्क साधावा.

संजय गांधी निराधार योजना :

या योजनेतंर्गत ६५ वर्षाखालील निराधार पुरुष व महिला, अनाथ मुले, अपंगातील सर्व प्रवर्ग, क्षयरोग, कर्करोग, एड्स, कुष्ठरोग यासारख्या आजारामुळे स्वत:चा चरितार्थ चालवू न शकणारे पुरुष व महिला, निराधार विधवा

(आत्महत्या केलेल्या शेतक-यांच्या विधवासह), घटस्फोट प्रक्रियेतील व घटस्फोट झालेल्या परंतु पोटगी न मिळालेल्या, अत्याचारित व वेश्या व्यवसायातून मुक्त केलेल्या महिला तृतीयपंथी, देवदासी, ३५ वर्षावरील अविवाहित स्त्री (कुमारी), तुरूंगात शिक्षा भोगत असलेल्या कैद्यांची पत्नी, सिकलसेलग्रस्त या सर्वांना लाभ मिळतो. या योजनेमध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाच्या यादीत नाव, अथवा २१ हजार रू. पर्यंत कौटुंबिक वार्षिक उत्पन्न अशी अट आहे. राष्ट्रीयीकृत बँकेत खाते उघडून ते आधार, मोबाईल लिंक, आधार सिडिंग करावे. दरवर्षी एप्रिल ते जून दरम्यान बँक, तहसीलमध्ये हयातीचा दाखला दयावा लागतो.

अर्ज सादर केल्यानंतर तालुकास्तरीय संजय गांधी निराधार योजना अनुदान समितीच्या बैठकीत या अर्जांच्या मंजुरीबाबत निर्णय घेतला जातो त्यानुसार पात्र लाभार्थींना आपला प्रस्ताव मंजूर झाल्याचे लेखी पत्र अर्जात नमूद पत्त्यावर पाठविले जाते त्यानुसार प्रस्ताव मंजूर झालेल्या महिन्याच्या पुढील महिन्यापासून लाभ दिला जातो त्यासाठी संजय गांधी निराधार योजना विभागातून लाभार्थ्यास प्राप्त झालेले लेखी पत्र आधार कार्ड व पासबुकची झेरॉक्स प्रत तहसील कार्यालयातील संजय गांधी निराधार योजना विभागात सादर करावी लागते.

आवश्यक कागदपत्रे : अर्जदाराची दोन छायाचित्रे कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे आधार कार्ड पॅन कार्ड तलाठी व तहसीलदारांनी दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र अर्जदाराचा बँक पासबुक तलाठी तहसीलदारांचा रहिवासी प्रमाणपत्र शिधापत्रिका यांच्या झेरॉक्स प्रति अर्जासोबत जोडणे आवश्यक असते.

फायदे

या योजनेखाली पात्र होणा-या कुटूंबात एक लाभार्थी असल्यास दरमहा पंधराशे रू. अर्थसहाय्य मिळते.

अर्ज कसा करावा

अर्जदार तहसील कार्यालयातील संजय गांधी योजना विभाग/तलाठी कार्यालय या ठिकाणी ऑनलाईन अर्ज करू शकता.

राष्ट्रीय कुटुंब सहायता योजना:

लाभार्थी: दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील १८ ते ५९ वयोगटातील कमावत्या व्यक्तीचा अपघाती अथवा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबियास एक रकमी २० हजार रू. चे अर्थसहाय्य देण्यात येते.

अर्ज कसा करावा

तहसीलमधील संजय गांधी योजना/तलाठी कार्यालयात ऑनलाईन अर्ज करावा लागतो.

आवश्यक कागदपत्रे: दारिद्र्य रेषेच्या यादीत नाव असल्याचा पुरावा किंवा पिवळी शिधापत्रिका. पतीचा मृत्यू दाखला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले बालसंगोपन योजना :

महाराष्ट्र सरकारच्या महिला व बालविकास विभागामार्फत ही योजना १९७५ पासून राबविण्यात येत आहे. विविध कारणास्तव आई, वडील अथवा दोन्ही पालक मयत झालेल्या व कोणत्याही संस्थेत दाखल नसलेल्या शून्य ते अठरा वर्षापर्यंतच्या बालकांना या योजनेंतर्गत दरमहा २ हजार २५० रू. शिक्षण व संगोपनासाठी मिळतात. ही रक्कम लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात डीबीटीद्वारे जमा केली जाते.

आवश्यक कागदपत्रे

वडील किंवा आईचा मृत्यू दाखला, आधार कार्ड, रहिवासी प्रमाणपत्र, शिधापत्रिका, सांभाळ करणाऱ्या हयात पालकाचा उत्पन्न दाखला, पॅनकार्डची झेरॉक्स. बालकाचे आधार, अर्जदार बालकाचे मागील वर्षाचे निकालपत्र, राष्ट्रीयीकृत बँकेच्या आधार सिडिंग पासबुकची झेरॉक्स, शाळेचे ओरिजनल बोनाफाईड, ३ पासपोर्ट छायाचित्रे, तेरा पानी अर्जाच्या पहिल्या पानावर अंगणवाडी ताई, सरपंच यांचा सही शिक्का, अंगणवाडी ताईसोबत अर्जदार, कुटुंबाचे छायाचित्र. तीन प्रतित अर्ज पंचायत समितीमधील बालविकास प्रकल्पाधिकारी किंवा तालुका संरक्षण अधिकाऱ्यांकडे सादर करावा. अथवा जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, जिल्हा बालकल्याण समिती कार्यालयाशी संपर्क साधावा.

नुतनीकरणाची पद्धत: लाभ सुरू असलेल्या लाभार्थ्यांनी दरवर्षी एप्रिल महिन्यात प्रस्तावाचे नूतनीकरण करणे आवश्यक असते त्यासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय तसेच पंचायत समिती मधील बालविकास प्रकल्प अधिकारी किंवा तालुका संरक्षण अधिकारी यांच्याकडून अथवा यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या स्वयंसेवी संस्थांमार्फत लाभार्थ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या जातात नूतनीकरणासाठी लागणारी कागदपत्रे बालक व पालक यांचे आधार कार्ड रहिवासी दाखला बालकाचे स्वतंत्र किंवा बालक पालक यांचे संयुक्त राष्ट्रीयकृत बँक खाते पासबुक झेरॉक्स तहसीलदारांचा चालू वर्षाचा उत्पन्नाचा दाखला पालकाचा मृत्यू दाखला पालक मृत्यू कारण डेथ सर्टिफिकेट बालकाचा चालू वर्षाचा शाळेतील बोनाफाईड दाखला बालकाचे नाव असलेल्या शिधापत्रिकेची झेरॉक्स बालकाचे पासपोर्ट आकाराचे दोन छायाचित्रे बालक व पालक यांचा त्यांच्या घरासमोरील छायाचित्र पालक हयात असल्याचा दाखला अशा कागदपत्रांच्या झेरॉक्स नूतनीकरणासाठी आवश्यक असतात याविषयीच्या शंका व अडचणींसाठी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

जिल्हा शिक्षणाधिकारी, गटशिक्षणाधिकारी अथवा मुख्याध्यापक, शिक्षक यांच्या सहकार्याने बालसंगोपन योजना राबविल्यास शाळेतील प्रत्येक वर्गातील पात्र, गरजू, होतकरू, गरीब लाभार्थी विद्यार्थी, बालकास योजनेचा लाभ मिळणे अधिक सोपे होते.

शिष्यवृत्ती योजना :

पहिली ते दहावी पर्यंतच्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमातीमधील मुलींच्या शिक्षणास प्रोत्साहन देण्यासाठी सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. याशिवाय विविध वर्गवारीतील विद्यार्थ्यांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या शिष्यवृत्ती योजना आहेत. याबाबत शाळेचे मुख्याध्यापक, महाविद्यालयाचे प्राचार्य यांच्याशी संपर्क साधावा.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजना :

अनुसूचित जाती जमाती इतर मागासवर्ग विशेष मागास प्रवर्ग व आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना इयत्ता दहावी नंतरचे शिक्षण घेण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मॅट्रिक उत्तर शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आर्थिक सहाय्य केले जाते. सरकारी शैक्षणिक संस्था किंवा सरकार मान्य शैक्षणिक संस्थेत दहावी नंतरचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही योजना लागू आहे. या योजनेत विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क, शिक्षण शुल्क (ट्युशन फी), महाविद्यालयाचे शासनमान्य शुल्क सरकारकडून भरले जाते. यासोबतच प्रवर्गानुसार दरमहा १२० ते ५०० रुपये निर्वाह भत्ता विद्यार्थ्यांना देण्यात येतो.

आवश्यक कागदपत्रे: अर्जदाराचा जातीचा दाखला, आधार कार्ड, शिधापत्रिका (रेशन कार्ड), अर्जदाराची पासपोर्ट आकाराची छायाचित्रे, महाविद्यालयाचे प्रवेश पत्र, अथवा बोनाफाईड, तहसीलदारांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला बँक, पासबुक झेरॉक्स. *अर्ज कुठे करावा:* याबाबत संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य व शिष्यवृत्ती विभागातून वेळोवेळी मार्गदर्शन केले जाते. अर्ज आवश्यक कागदपत्रांसह महाडीबीटी पोर्टलवर भरणे आवश्यक असते.

किशोरी सबला योजना :

या योजनेअंतर्गत ११ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींना आर्थिक मदत केली जाते. वर्षातील ३०० दिवस पोषण आहार मिळावा, यासाठी शाळेतील किंवा शाळा सोडलेल्या मुलींना सुद्धा आर्थिक मदत केली जाते. याशिवाय

किशोरवयीन मुलींना विविध प्रशिक्षण देण्याचे काम योजनेअंतर्गत केले जाते. *आवश्यक कागदपत्रे:* अर्जदाराचे छायाचित्र, आधार कार्ड, दारिद्र्यरेषेखालील असल्याचे प्रमाणपत्र, पिवळी शिधापत्रिका, बँक पासबुकची झेरॉक्स.

सारथी शिष्यवृत्ती योजना :

दुर्बल घटक प्रवर्गातील इयत्ता नववी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी सारथीमार्फत ही शिष्यवृत्ती योजना राबविली जाते. वार्षिक साडेतीन लाख रुपये आर्थिक उत्पन्न असणाऱ्या पालकांच्या पाल्यांसाठी ही योजना आहे. राष्ट्रीय दुर्बल घटक शिष्यवृत्ती (एन.एम.एम.एस.) परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व केंद्र सरकारची शिष्यवृत्ती रक्कम मिळत नसणाऱ्या विद्यार्थ्यांना सारथी शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत ९ हजार ६०० रुपये वार्षिक अर्थसहाय्य करण्यात येते. यासाठी मुख्याध्यापकांमार्फत पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांचे प्रस्ताव शिक्षण विभागामार्फत शिष्यवृत्तीसाठी पाठविले जातात.

अटल पेन्शन योजना :

ही असंघटित क्षेत्रातील नागरिकांसाठी असणारी योजना आहे. या योजनेच्या लाभार्थ्यांची वयोमर्यादा किमान १८ वर्षे आणि कमाल ४०वर्षे अशी आहे. सर्व बँक खातेदार या योजनेमध्ये सहभागी होऊ शकतात या योजनेद्वारे असंघटित कामगारांना वृद्धापकाळत आर्थिक सुरक्षा वयाच्या साठ वर्षानंतर दरमहा ५ हजार रुपयांपर्यंत मासिक पेन्शनचा लाभ मिळू शकतो १८ ते ४० वयोमर्यादा असणाऱ्या नागरिकांना या योजनेचा लाभ मिळतो.

रोजगारासाठी कर्ज योजना :

पंतप्रधान मुद्रा योजना: तळागाळातील नागरिकांचा आर्थिक व सामाजिक विकास घडवून आणणे हा या प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा मुख्य उद्देश आहे या योजनेमध्ये जामीनदार किंवा जामीनदारशिवाय छोट्या उद्योजकांना ५० हजार ते १० लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते. मुद्रा योजनेतून अर्थसहाय्य मिळवून व्यवसायासाठी लागणाऱ्या भांडवलाचे निकड भागविता येते या कर्जाच्या शिशु श्रेणीमध्ये रुपये ५० हजारापर्यंत चे कर्ज किशोर श्रेणीमध्ये रुपये ५० हजार ते ५ लाख रुपयांपर्यंत कर्ज तरुण श्रेणीमध्ये पाच लाख दिले जाते याशिवाय पंतप्रधान मुद्रा योजनेअंतर्गत मुद्रा कार्डच्या माध्यमातून (रोख पत (कॅश क्रेडिट) स्वरूपात उद्योगासाठी खेळते भांडवलाची सुविधा उपलब्ध करून दिली जाते महिला उद्योजकांना कमी व्याजदरामध्ये कर्ज दिले जाते त्यानुसार सूक्ष्मपत योजनेसाठी १ लाख रुपये पर्यंतची मर्यादा आहे.

आवश्यक कागदपत्रे अर्जदाराचा फोटो, पॅन कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक, व्यवसाय प्रमाणपत्र यांच्या झेरॉक्स, मागील दोन वर्षाचे आयकर विवरणपत्र, प्रकल्प अहवाल, मागील सहा महिन्यांचा बँक उतारा.

अर्ज कुठे करावा: आपले बँक खाते असणाऱ्या किंवा जवळच्या बँकेत.

प्रधानमंत्री (पी.एम.) स्वनिधी योजना :

देशातील फेरीवाले, हातगाडी व्यावसायिक व पथारी व्यवसायिकांच्या सशक्तीकरण व कल्याणाच्या दृष्टीने ही योजना आखण्यात आली आहे. त्यांना विनाकारण व बिनव्याजी कर्ज मिळावे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. त्यानुसार १० हजार रुपयांपासून कर्जाची सोय या योजनेत आहे. नियमित कर्ज फेडल्यास सात टक्के व्याज माफी मिळून पुढच्या वेळेस जास्त रकमेचे कर्ज मिळू शकते. दहा हजार ते पन्नास लाख रुपयांपर्यंत हातगाडी व पथारीवाल्यांना व्यवसाय वृद्धीसाठी प्रधानमंत्री स्वनिधी योजनेअंतर्गत वाजवी दरात कर्ज मदत मिळते. या योजनेचा लाभ घेण्यासाठी महा-ई-सेवा केंद्रातून ऑनलाइन अर्ज करावा लागणार आहे

अधिक माहितीसाठी : pmsvanidhi.gov.in यावर संपर्क साधावा.

स्टँड अप इंडिया योजना :

अनुसूचित जाती व जमाती समुदायातील महिला उद्योजकांच्या उद्योजकतेला आर्थिक मदत करण्यासाठी भारत सरकारने स्टॅन्ड अप इंडिया ही योजना सुरू केली आहे एससी एसटी प्रवर्गातील महिला उद्योजकाकडे किमान ५१ टक्के शेअर्स असलेल्या व्यवसायांना या योजनेतून निधी मिळू शकतो. स्टॅन्ड अप इंडिया कर्ज योजना प्रकल्प खर्चाच्या ७५ टक्के खर्च कव्हर करेल. अनुसूचित जाती जमाती व महिलांना नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी १०लाख ते ९ कोटी रुपयांपर्यंत या योजनेतून कर्ज दिले जाते.

पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना :

या योजनेत सहभागी होण्यासाठी किमान वय १८ वर्षे व कमाल वय ५० वर्षे असले पाहिजे. या योजनेसाठी कोणत्याही बँकेत बचत खाते असणे आवश्यक आहे. ३३० रुपयांच्या वार्षिक हप्त्यामध्ये संबंधित खातेदाराच्या मृत्यूपेक्षा त्याच्या कुटुंबाला अथवा वारसाला २ लाख रुपयांचा जीवन विमा मिळू शकतो. सर्व बँक खातेदार या योजनेचा लाभ घेऊ शकतात. त्यासाठी त्यांनी आपले खाते असलेल्या बँकेमध्ये या योजनेमध्ये सहभागी

होण्यासाठी संबंधित शाखाधिकारी किंवा इतर अधिकाऱ्यांशी संपर्क साधून योजनेचा अर्ज भरून देणे आवश्यक आहे.

पंतप्रधान सुरक्षा विमा योजना :

देशातील गरीब व मागासलेल्या लोकांना रस्ता सुरक्षा लाभावी म्हणून ही अपघाती विमा योजना सुरू केली आहे. ही योजना १८ ते ७० वयोगटातील लोकांना लागू आहे. बँकेत खाते उघडताना या योजनेत सहभागी होता येते. या योजनेसाठीचा नाममात्र असलेला वार्षिक विमा हप्ता बँक खात्यातूनच वजा करून भरता येतो. खातेदाराचा शकते. योजनेच्या अधिक माहितीसाठी आपल्या बँकेशी संपर्क साधावा.

प्रधानमंत्री आयुष्मान योजना :

ही केंद्र सरकारची आरोग्य विमा योजना आहे. सर्व सरकारी रूग्णालयांसह पॅनलवरील खासगी रूग्णालयात या योजनेंतर्गत लाभ मिळतो. यासाठी रूग्णालयात असलेल्या आरोग्य मित्रांकडून गरजू रूग्णांना मार्गदर्शन केले जाते. योजनेच्या लाभासाठी योजनेचे कार्ड, शिधापत्रिका,आधार कार्ड आवश्यक असते. ग्रामपंचायत, ग्रामीण रूग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र, जिल्हा रूग्णालयातून कार्ड दिले जाते. पंचायत समितीच्या आरोग्य विभागामार्फत त्यांच्या कडे प्राप्त ऑनलाईन यादीनुसार कार्ड काढून दिले जात आहेत.

एकत्रित आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना:~ महाराष्ट्र सरकारची महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना तसेच केंद्र सरकारची आयुष्मान भारत व प्रधानमंत्री जन आरोग्य योजना या योजना मिळून तयार करण्यात आलेली महाराष्ट्र शासनाची ही एकत्रित व राज्यातील सर्वांच्या आरोग्याची काळजी घेणारी आरोग्य विमा योजना आहे. ही योजना महाराष्ट्रातील सरसकट सर्व नागरिकांसाठी लागू आहे. त्यासाठी कोणत्याही शिधापत्रिकेची अथवा आर्थिक उत्पन्न मर्यादेची अट नाही. या योजनेच्या पॅनलवर असलेल्या महाराष्ट्रातील शासकीय व खाजगी रुग्णालयामध्ये दाखल असलेल्या रुग्णांचा पाच लाख रुपयांपर्यंतचा निदान, औषधोपचार, शस्त्रक्रिया यावरील खर्च या आरोग्य विमा योजनेतून संबंधित रूग्णालयास अदा केला जातो. या योजनेसाठी रुग्ण महाराष्ट्राचा रहिवासी असल्याचा पुरावा आवश्यक आहे. यासाठी राज्य शासनाच्या माध्यमातून एकत्रित आरोग्य विमा योजनेचे कार्ड दिले जात आहेत. याबाबत जिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच पॅनल वरील रुग्णालयांमधील आरोग्य मित्रांकडे अधिक माहिती मिळू शकेल. हेल्पलाइन क्रमांक १५५३८८/१८००२३३२२०० यावर योजनेची माहिती मिळविता येईल. याशिवाय विविध सहकारी, खाजगी व राष्ट्रीयकृत बँका ंमध्ये जीवन विमा व आरोग्य विमा योजना राबविल्या जात आहेत.

बँका व संबंधित विमा कंपन्यांचे यासाठी सामंजस्य करार झालेले आहे बँक व विमा कंपनीच्या प्रकारानुसार विमा उत्पादनाची रचना व हप्ते प्रीमियम वेगवेगळ्या प्रकारचे आहेत त्यामुळे बँक खातेदारांनी आपल्या गरजेनुसार कोणते विमा उत्पादन आपल्यासाठी योग्य ठरेल याची माहिती आपले बँक खाते असलेल्या बँकेतून मिळविल्यास या योजनांचा लाभ घेता येतो.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष :

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी मधून रुग्णांना अर्थसाह्य मिळविण्याची प्रक्रिया पूर्णपणे मोफत आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी मिळणाऱ्या वीस आजारांची यादी अशी: दोन ते सहा वर्षापर्यंतच्या बालकांची कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया, हृदय प्रत्यारोपण, यकृत प्रत्यारोपण, किडनी प्रत्यारोपण, बोन मॅरो प्रत्यारोपण, फुफ्फुस प्रत्यारोपण, हाताचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, अपघात शस्त्रक्रिया, लहान बालकांच्या शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायलिसिस, अपघात, कर्करोग (केमोथेरपी/ रेडिएशन), नवजात शिशुंचे आजार, गुडघा प्रत्यारोपण, भाजलेले रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण यांना या योजनेचा लाभ मिळू शकतो.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी मिळविण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे : विहित नमुन्यात अर्ज निदान व उपचारासाठी लागणाऱ्या वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र (इस्टिमेट), रुग्ण खासगी रुग्णालयात असल्यास खर्चाचे प्रमाणपत्र सिव्हिल सर्जन (शल्य जिल्हा शल्य चिकित्सक) यांच्याकडून प्रमाणित करणे आवश्यक असते. तहसीलदारांचा वार्षिक १ लाख ६० हजार रुपयांपेक्षा कमी उत्पन्नाचा दाखला, रुग्णाचे आधार कार्ड व रेशन कार्ड महाराष्ट्राचे असावे, लहान बाळाच्या उपचारासाठी त्याच्या आईचे आधार कार्ड आवश्यक असते. संबंधित आजाराचे बायोप्सी/एम. आर. आय./सी. टी. स्कॅन/डायलिसिस चार्ट/ अँजिओग्राफी/ टुडे इको रिपोर्ट/एक्स-रे असे अहवाल अर्जासोबत जोडावे लागतात. अपघात ग्रस्त भाजलेले रुग्ण विद्युत अपघात ग्रस्त रुग्ण यांच्यासाठी पोलीस रिपोर्ट/एफआयआर रिपोर्ट आवश्यक असतो. अवयव प्रत्यारोपण रुग्णांसाठी ZTCC/Form-19 शासकीय समितीची मान्यता आवश्यक. रुग्णाचे ॲडमिट असलेले जिओ टॅग छायाचित्र आवश्यक.

मुख्यमंत्री वैद्यकीय साहित्य निधीसाठी फाईल जमा केल्यास त्या फाईलची सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी ८६५०५६७५६७

या टोल फ्री क्रमांकावर व्हाट्सअप केल्यास आपल्याला व्हाट्सअपवर फाईलची माहिती मिळेल. वैद्यकीय सहायता निधी कक्ष अंगीकृत असलेल्या रुग्णालयांची यादी
cmrf.maharashtra.gov.in/CMRF Hospitals List.pdf या वेबसाईटवर उपलब्ध आहे. अर्थसाह्याची मागणी ईमेल द्वारे aao.cmrf.mh@gov.in यावर केल्यास अर्जासह सर्व कागदपत्रे पीडीएफ स्वरूपात

पाठवावीत. त्याच्या प्रति मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीकडे मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्ष, मुख्यमंत्री सचिवालय, सातवा मजला, मुख्य इमारत, नरिमन पॉईंट मंत्रालय मुंबई ४०००३२ या क्रमांकावर टपालाद्वारे तात्काळ पाठवावीत.

थेट लाभ हस्तांतरण (डी.बी.टी.) योजना :

या योजनेत केंद्र किंवा राज्य सरकारकडून दिले जाणारे सरकारी अनुदान लाभधारकाच्या बँक खात्यात थेट जमा करण्याची संगणकीय प्रणाली विकसित करण्यात आली आहे. त्यानुसार शासकीय योजनेचे अनुदान लाभधारकाच्या थेट बँक खात्यामध्ये जमा करण्याची डीबीटी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. अनुदान देण्यातील भ्रष्टाचार व अनुदान, लाभ जमा होताना होणाऱ्या विलंबास आळा घालणे हे उद्दिष्ट साध्य केले जात आहे. यामुळे आर्थिक व्यवस्थेत दलाल, एजंटांपासून दूर राहून वेळेत व लाभार्थ्यांच्याच बँक खात्यात पैसे जमा होण्याची खात्री निर्माण होत आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) :

१ ते ५० लाख रू. पर्यंत महाराष्ट्र शासनाच्या योजनेतर्गत १५ % ते ३५%पर्यंत अनुदान घेऊन उद्योग सुरू करता येईल. महाराष्ट्र शासनाच्या उद्योग संचालनालयांतर्गत महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्य उद्योग केंद्रांच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात येत आहे. त्यानुसार राज्य शासनाच्या भक्कम सहकार्याने तरुण /तरूणींना नवीन उद्योजक बनण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (CMEGP) :

योजनेचे संकेतस्थळ : https://maha-cmegp.gov.in

योजनेचे कार्यक्षेत्र : महाराष्ट्र राज्य.

योजनेची सुरुवात : १ ऑगस्ट २०१९ पासून अंमलबजावणी सुरू झाली आहे .

योजनेचा उद्देश : महाराष्ट्र राज्यातील युवक /युवतींना स्वयंपूर्ण आत्मनिर्भर बनविणे .

योजना अंमलबजावणी यंत्रणा :

१) जिल्हा उद्योग केंद्र (DIC) :- शहरी व ग्रामीण भाग

वित्तीय संस्था (बँक) :- १) सर्व राष्ट्रीयीकृत बँका , २) Yes Bank , HDFC , ICICI Bank ,ADCC

योजनेचे निकष :

१) वयोमर्यादा १८ ते ४५

(अ जा /अ ज/ महिला / माजी सैनिक याना ५० वर्ष)

२) शैक्षणिक पात्रता

(i) प्रकल्प रु १० ते २५ लाखासाठी ७ वी पास

(ii) प्रकल्प रु २५ ते ५० लाखासाठी १० वी पास

3) उत्पादन उद्योग :- (कमाल प्रकल्प मर्यादा) ५० लाख

४) सेवा उद्योग :- (कमाल प्रकल्प मर्यादा) २० लाख

प्रकल्प अहवाल खालील विहित निकषांवर अधारीत असणे आवश्यक आहे

(i) स्थिर भांडवल :- मशीनरी रक्कम कमीत कमी ५०%

(iI) इमारत बांधकाम :- जास्तीत जास्त २०% (iii)खेळते भांडवल :- जास्तीत जास्त ३०%

५) स्वगुंतवणूक : SC ,ST ,OBC,NT,VJNT,अल्पसंख्याक ,महिला, अपंग, मा. सैनिक ५% व इतरांसाठी १०%

६) अनुदान मर्यादा :- १५ ते ३५ %

१) शहरी भाग - SC,ST,OBC,NT,VJNT,अल्पसंख्याक ,अपंग ,महिला, माजी सैनिक २५% , इतरांसाठी १५% अनुदान .

२) ग्रामीण भाग - SC/ST ,OBC,NT,VJNT,अल्पसंख्याक , अपंग ,महिला , माजी सैनिक ३५% , इतरांसाठी २५% अनुदान

७) *ही योजना नवीन स्थापन होणाऱ्या उद्योगासाठी आहे.*

८) पात्र मालकी घटक :- वैयक्तिक , एकल मालकी कंपनी (OPC), मर्यादित दायित्व संस्था (LLP),भागीदारी, बचत गट

९) ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करण्यासाठी लागणारे विहित कागदपत्र

१)पासपोर्ट साइज फोटो

२) आधार कार्ड

३) जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला /डोमिसीयल सर्टिफिकेट

४) शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र (आपले शिक्षण किती झाले याचा पुरावा जसे १० वी , १२ वी, पदवीचे गुणपत्रक)

५)हमीपत्र (Undertaking Form) वेबसाईटवर मेनू मध्ये मिळेल

६)प्रकल्प अहवाल

७) जातीचे प्रमाणपत्र (अ जा /अ ज असेल तर)

८) विशेष प्रवर्ग असेल तर प्रमाणपत्र (माजी सैनिक, अपंग)

९) REDP/EDP/SDP किंवा कौशल्य विकास प्रशिक्षण झाले असेल तर प्रमाणपत्र

१०) लोकसंख्याचा दाखला (२० हजार पेक्षा कमी लोकसंख्या असेल तर)

११) पार्टनरशिप उद्योग असेल तर i) रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र

Ii)अधिकार पत्र ,घटना

टीप :- वरील कागदपत्रामधील अनुक्रमांक १ ते ४ हे संगणकावर अपलोड करण्यासाठी ३०० KB पर्यंत व अ क्र ५ आणि ६ हे १ MB पर्यंत असावे .

वरील योजनेचा लाभ घेण्यासाठी तात्काळ

https://maha-cmegp.gov.in

सदर संकेत स्थळाला भेट दयावी व आजच संकेतस्थळावर अर्ज दाखल करावेत .

- ६०% - ८०% बँकेचे कर्ज
- ३०% महिलासाठी अनुदान राखीव
- २० %SC/ST साठी अनुदान राखीव
- *एक कुटुंब एक लाभार्थी*

काही उत्पादन उद्योग/सेवा उद्योगाची उदाहरणार्थ यादी

उत्पादन उद्योग

१)सॅनिटायझर उत्पादन

२) मास्क तयार करणे

३) साबण तयार करणे

४) फार्मास्युटिकल्स प्रॉडक्टस् (औषधी उत्पादने)

५)दवाखाण्यासाठी लागणाऱ्या विविध   वस्तू तयार करणे

६) विविध खाद्य पदार्थ तयार करणे

७) डाळ मिल

८) ऑइल मिल

९) दुग्धजन्य पदार्थ तयार करणे

१०) आईस्क्रीम उत्पादन

११) आईस उत्पादन

१२) बेकरी उत्पादन

१३) गुळ उत्पादन

१४)चॉकलेट उत्पादन

१५)विविध प्रकारचे मसाले तयार करणे

१६) कोल्ड्रिंक्स तयार करणे

१७) पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर

१८) कॅटल फीड तयार करणे

१९) पोल्ट्री फीड तयार करणे

२०) रेडिमेड गारमेंट्स (ड्रेस तयार करणे)

२१) स्टोन क्रशर

२२) सिमेंट प्रॉडक्ट्स तयार करणे

२३) प्लास्टिक प्रॉडक्ट्स उत्पादन

२४) वायर उत्पादन

२५)स्टील फर्निचर उत्पादन

२६) स्टील फॅब्रिकेशन

२७) शेती अवजारे उत्पादन

२८)प्लायवुड फर्निचर उत्पादन

२९)दागिने तयार करणे

३०) बूट / चप्पल उत्पादन

३१) कोरोगेटेड बॉक्स उत्पादन

३२) ऑफसेट प्रिंटिंग

३३) पी व्ही सी पाईप उत्पादन

३४) भांडी उत्पादन

३५) मूर्ती तयार करणे

३६) खते उत्पादन

३७) दंतमंजन उत्पादन

३८) केश ऑइल तयार करणे

३९) केमिकल उत्पादन

४०) खेळणी तयार करणे

४१)आयुर्वेदिक औषधे तयार करणे

४२) काटेरी तारांचे उत्पादन

४३) खिळे उत्पादन

४४) इमिटेशन ज्वेलरी (बांगड्या) उत्पादन

४५) मशीनरीचे सुटे भाग उत्पादन

४६) वजन काटा उत्पादन

४७) बॅग उत्पादन

४८) गादी कारखाना

४९)होजीअरी उत्पादन

५०) पेपर कप उत्पादन

५१) सॅनिटरी पॅड उत्पादन

५२) फळ प्रक्रिया

५३) मेणबत्ती उत्पादन

५४) खडू उत्पादन

५५) पापड उत्पादन

५६) पोहा उत्पादन

५७) बेदाना/मनुका उत्पादन

५८) शैम्पू उत्पादन

५९) बायोकोल ब्रिकेट्स

६०) बारदाना उत्पादन

सेवा उद्योगांची उदाहरणार्थ यादी

१) खाणावळ

२) लॉन्ड्री

३) ब्युटीपार्लर

४) केश कर्तनालय

५) वाहन दुरुस्ती

६) व्हील अलॉयमेंट

७) डेंटिग पेन्टिंग

८) पिठाची गिरणी

९) मिरची कांडप

१०) शिवणकाम

११) बॅन्ड पथक

१२)फोटोग्राफी

१३)संगणक प्रशिक्षण केंद्र

१४) इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल उपकरणे दुरुस्ती

१५) वेल्डिंग वर्क

१६) मंडप डेकोरेशन

१७) झेरॉक्स सेंटर

१८) चहा स्टॉल

१९) मोटार रिविंडिंग

२०)केबल टीव्ही नेटवर्क

२१)रसवंती

२२)मंगल सेवा व इतर.

या योजने अंतर्गत महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्ह्यामध्ये अर्ज करता येईल .

ही योजना पूर्णपणे ऑनलाईन असून महाराष्ट्रातील कोणत्याही जिल्ह्यात अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच करावा लागेल .

याव्यतिरिक्त अन्य

माहितीसाठी आपल्या जिल्हा उद्योग केंद्राशी संपर्क साधा.

ई-श्रम कार्ड योजना :

कामगार, फेरीवाले, घर कामगार, भूमिहीनन शेतमजूर, रिक्षाचालक, सुरक्षा रक्षक, पान टपरी चालक, लॉन्ड्री अशा व्यवसायातील श्रमिक ई श्रम कार्ड योजनेसाठी नाव नोंदणी करू शकतात. कार्ड काढण्यासाठी १६ वर्षांपेक्षा जास्त आणि ५९ वर्षांपर्यंतचा कोणताही कामगार शासकीय पोर्टलवर स्वतःची नोंदणी करू शकतो. कामगार जर करदाता असेल तर त्यालाही श्रम पोर्टलवर नोंदणी करता येणार नाही. जो ईपीएफओ, एस. आय. सी. किंवा एन.पी.एस. चा सदस्य नाही, असाच कामगार या ई- श्रम पोर्टलवर नोंदणी करण्यास पात्र आहे.

योजनेचा लाभ काय:

कामगार, रिक्षा चालक, घरगुती कामगार यांना दोन लाखांपर्यंत अपघाती विमा दिला जाईल. भविष्यात विविध योजना असंघटित कामगारांपर्यंत ई- श्रम कार्डच्या माध्यमातून पोहोचविण्याचा केंद्र सरकारचा प्रयत्न आहे.

https://eshram.gov.in

पंतप्रधान जन धन योजना :

"मेरा खाता मेरा भाग्य विधाता" हे प्रधानमंत्री जनधन योजनेचे ब्रिदवाक्य आहे. देशातील गरीब लोकांची बँक व्यवहार करण्याची क्षमता वाढावी तसेच अत्यंत कमी खर्चात विम्याची सेवा उपलब्ध व्हावी, हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. बँक सेवा व कर्ज पुरवठ्याची सेवा, खातेदाराला डेबिट कार्ड द्वारे एक लाख रुपयांचा अपघाती विमा या योजनेत दिला जात आहे. बँकेचे हे खाते शून्य शिल्लक (झिरो बॅलन्स) असते. याशिवाय खातेदाराला पाच हजार रुपये अधिकर्ष (ओव्हर ड्राफ्ट) सवलत मिळू शकते. अधिक माहितीसाठी https:// pmidy.gov.in

पंतप्रधान शेतकरी सन्मान (पीएम किसान)

भारतातील शेतकऱ्यांसाठी ही कल्याणकारी योजना आहे. या योजनेअंतर्गत, २ हेक्टरपर्यंत जमीन असलेल्या शेतकऱ्यांना दरवर्षी ६००० रू. आर्थिक मदत दिली जाते. ही रक्कम २ हजार रूपयांच्या तीन हप्त्यांमध्ये प्रारंभी दिली जात आहे.

योजनेचे उद्दिष्ट:

शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा करणे,

शेतीसाठी आवश्यक साधनांची खरेदी करण्यास मदत करणे,

शेतीला प्रोत्साहन देणे.

योजनेची पात्रता:

शेतकरी भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे.

शेतकऱ्याची २ हेक्टरपर्यंत जमीन असणे आवश्यक आहे.

शेतकऱ्याचे नाव आधारशी लिंक असणे आवश्यक आहे.

शेतकरी आयकरदाता नसावा.

अर्ज कसा करावा:

पीएम किसान योजनेसाठी अर्ज ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने करता येतो.

ऑनलाइन अर्ज करण्यासाठी, पीएम किसान योजनेच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या.

ऑफलाइन अर्ज करण्यासाठी, जवळच्या कृषी कार्यालयात संपर्क साधा.

आवश्यक कागदपत्रे:

शेतीचा सात बारा उतारा, रहिवासी दाखला, आधार कार्ड

बँक खाते क्रमांक, भूमी अभिलेख उतारा.

कोणाशी संपर्क साधावा :तालुका कृषी अधिकारी कार्यालय, ग्रामसेवक, कृषी सहायक, तहसील कार्यालय.

नमो शेतकरी सन्मान योजना :

केंद्र सरकारच्या पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेच्या धर्तीवर महाराष्ट्र सरकार देखील नमो शेतकरी सन्मान योजना राबवित आहे.

केंद्र आणि राज्य सरकार शेतकऱ्यांच्या विकासासाठी समर्पित असून या दिशेने जोरकस प्रयत्न सुरू आहेत. शेतकऱ्यांना अडचणीच्या काळात शेतकऱ्यांना या सन्मान योजनेचा फायदा होत आहे. राज्य सरकार केंद्र सरकारप्रमाणे 'नमो शेतकरी सन्मान निधी" अंतर्गत योजनेंतर्गत' तीन टप्प्यात ६ हजार रुपये देत आहे. त्यामुळे केंद्र व राज्य अशा दोन्ही च्या शेतकरी सन्मान योजनेतून शेतकऱ्यांना वार्षिक १२ हजार रू. लाभ मिळत आहे. लवकरच महाराष्ट्र सरकार हे अर्थसहाय ३ हजार रुपयांनी वाढविणार आहे.

पात्रता : पंतप्रधान शेतकरी सन्मान योजनेप्रमाणे.

अधिक माहितीसाठी: तालुका कृषी अधिकारी कार्यालय किंवा कृषी सहायक यांच्याशी संपर्क साधावा.

किसन क्रेडिट कार्ड : अर्जदाराचे नाव, पत्ता, बँकेतील खाते क्रमांक, मालकीच्या जमिनीचा तपशील, खरीप व रब्बी मध्ये कोणती पिके घेतात याची माहिती, पशुपालन करणारा अर्जदार असल्यास त्याच्याकडील कोंबड्या, गाई, म्हशी इत्यादी जनावरांचा तपशील व शेवटी तारण काय ठेवू शकता? त्याची माहिती अर्ज भरून ज्या बँकेत खाते असेल त्या बँकेत जमा करावा लागतो. त्यानंतर कर्ज मिळू शकते. १ लाख ६० रुपयांपर्यंतच्या कर्जाला कुठल्याही तारण ठेवावे लागत नाही. ज्या शेतकऱ्यांची नावे जमीन आहे किंवा ज्यांनी दुसऱ्या शेतकऱ्याची जमीन करण्यासाठी भाडेतत्त्वावर घेतले आहे असे कोणीही शेतकरी किसान क्रेडिट कार्ड साठी अर्ज करू शकतात.

संपर्क : https://pakistan.gov.in

शौचालय बांधणी योजना :

स्वच्छ भारत अभियानांतर्गत केंद्र सरकारने शौचालय बांधणी योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी केंद्र सरकारकडून १२ हजार रुपये अर्थसहाय दिले जाते. ग्रामीण भागातील लोकांना उघड्यावर शोच्यास जाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागते. या समस्येतून मुक्त करण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे.

ऑनलाइन नोंदणी करून लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ दिला जातो. केंद्र सरकारकडून शौचालय बांधण्यासाठी दिली जाणारी रक्कम लाभार्थ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात येते.

आवश्यक कागदपत्रे: आधार कार्ड उत्पन्न प्रमाणपत्र बँक पासबुक कायमचा पत्ता पासपोर्ट आकाराची छायाचित्रे मोबाईल क्रमांक

अधिक माहितीसाठी : https://swachbharat urban.gov.in

बांधकाम कामगार योजना :

१) सामाजिक सुरक्षा;

पाल्यांच्या व्यवहाराच्या खर्चाची प्रतिपूर्ती म्हणून ३० हजार रुपये दिले जातात. प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना, व्यक्तिमत्व विकास पुस्तक संचाचे वाटप केले जाते. अवजारे खरेदीसाठी ५ हजार रुपये मदत, सुरक्षा संच पुरविणे, अत्यावश्यक संच पुरविणे.

आवश्यक कागदपत्रे :

श्रम कार्ड नोंदणी आवश्यक आहे. योजनांनिहाय शपथपत्र व हमीपत्र विवाह नोंदणी प्रमाणपत्र शाळेतील ७५ टक्के उपस्थितीचा दाखला, किमान ५० टक्के गुण मिळाल्याची गुणपत्रिका, दहावी व अकरावीची गुणपत्रिका, वैद्यकीय अभियांत्रिकी पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी मागील शैक्षणिक वर्गात उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, एम. एस. सी. आय. टी. उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र.

२) शैक्षणिक लाभ : नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन मुलांसाठी शैक्षणिक योजनेअंतर्गत विविध लाभ व शिष्यवृत्ती दिली जाते. त्यानुसार इयत्ता पहिली ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी २५०० रू., आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना दरवर्षी ५ हजार रू., इयत्ता दहावी ते बारावी पर्यंत ५० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना दरवर्षी १० हजार रू. दिले जातात. अकरावी व बारावीच्या शिक्षणासाठी दरवर्षी १० हजार रुपये, पदवी अभ्यासक्रम शिक्षणासाठी दरवर्षी २० हजार रुपये दिले जातात. तसेच एम. एस. सी. आय. टी. शिक्षण मोफत दिले जाते. वैद्यकीय शिक्षणासाठी दरवर्षी १ लाख रुपये, अभियांत्रिकी शिक्षणासाठी ६० हजार रुपये, शासनमान्य पदविकेसाठी दरवर्षी २० हजार रुपये व पदव्युत्तर पदवीसाठी दरवर्षी २५ हजार रुपये शिष्यवृत्ती नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पहिल्या दोन अपत्यांसाठी लागू आहे.

आरोग्य विषयक लाभ :

नैसर्गिक प्रसूतीसाठी १५ हजार रुपये व शस्त्रक्रियेद्वारे प्रसुतीसाठी २० हजार रुपये, गंभीर आजाराच्या उपचारासाठी १ लाख रुपये ७५ टक्के पेक्षा जास्त अपंगत्व आल्यास २ लाख रुपये, व्यसनमुक्ती केंद्रातील उपचारासाठी ६ हजार रुपये दिले जातात.

आवश्यक कागदपत्रे: प्रसूतीचे प्रमाणपत्र (प्रसूती सहाय्य योजना), गंभीर आजार असल्याचे प्रमाणपत्र (उपचारार्थ मदतीकरिता), ७५ टक्के अपंगत्व असल्याचे प्रमाणपत्र (आर्थिक मदतीकरिता), व्यसनमुक्ती केंद्रातून उपचार घेत असल्याचे प्रमाणपत्र,

४) आर्थिक लाभ: कामगाराचा कामावर असताना मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास ५ लाख रुपये मदत दिली जाते. कामगाराचा नैसर्गिक मृत्यू झाल्यास त्याच्या कायदेशीर वारसास २ लाख रुपये मदत दिली जाते. अटल बांधकाम कामगार आवास योजनेअंतर्गत २ लाख रुपये अर्थसाह्य केले जाते. कामगाराचा ५० ते ६० वर्षे वयोगटात मृत्यू झाल्यास त्याच्या अंत्यविधीसाठी १० हजार रुपये मदत केली जाते. कामगाराचा मृत्यू झाल्यास त्याच्या पत्नीस अथवा पतीस दरवर्षी २४ हजार रुपये सलग ५ वर्षे मदत केली जाते. गंभीर आजाराच्या उपचारासाठी १ लाख रुपये मदत केली जाते.

आवश्यक कागदपत्रे: मृत्यू दाखला व ठेकेदाराचे कामावर असल्याचे प्रमाणपत्र, प्रधानमंत्री आवास योजनेत पात्र असल्याचे प्रमाणपत्र.

बांधकाम कामगारांच्या सर्व योजनांसाठी आवश्यक कागदपत्रे:

अर्जदाराची छायाचित्रे, आधार कार्ड, रेशन कार्ड, बँक पासबुक झेरॉक्स, बांधकाम कामगार नोंदणी प्रमाणपत्र (ई-श्रम कार्ड).

अधिक माहितीसाठी: महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी जिल्हा मंडळ, जिल्हा स्तरावरील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय किंवा

https://mahabocw.in/mr/ या संकेतस्थळावर संपर्क साधावा.

पंतप्रधान विश्वकर्मा योजना:

पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचा शुभारंभ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १७ सप्टेंबर २०२३ रोजी विश्वकर्मा जयंतीनिमित्त करण्यात आला. देशातील कारागिरांच्या कला कौशल्यास प्रोत्साहन मिळावे व त्यांना आर्थिक मदत करून त्यांनी आपली कला वाढवून प्रगती करावी, हा पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचा मुख्य हेतू आहे. खास करून देशातील छोटे कारागिर सुतार, कुंभार ,लोहार हे आर्थिक मागास वर्गामध्ये येतात. त्यांच्यासाठी पीएम विश्वकर्मा ही योजना एक वरदान ठरणार आहे. योजनेचा लाभ लोहार, चांभार, माळी, शिंपी अशा एकूण १४० जातींना त्यांच्या १८ प्रकारच्या पारंपरिक कला, व्यवसायासाठी मिळणार आहे.

योजनेचा लाभ: मोफत प्रशिक्षण, कारागिरांना त्यांची हत्यारे, सामान खरेदीसाठी पैसे, कर्ज, प्रमाणपत्र दिले जाते.

या योजेने अंतर्गत पात्र असलेल्यांना विविध प्रकारचे प्रशिक्षण व स्टायपेंड दिले जाईल. विविध प्रकारची कामाची अवजारे खरेदीसाठी १५ हजार रू. त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा केले जातात. आपला स्वतःचा व्यवसाय करण्यासाठी सरकारकडून ५ % व्याज दराने ३ लाख रुपये एवढी रक्कम दिली जाते. ही रक्कम दोन हप्त्यात जमा होते. पहिल्या हप्त्यामध्ये १ लाख रू.चे कर्ज दिले जाते. दुसरा हप्ता २ लाख रुपये एवढ्या रक्कमेचा असतो.

पीएम विश्वकर्मा योजनेचा उद्देश:

भारतातील विविध प्रकरच्या जाती जमाती सरकारकडून राबवलेल्या योजनेपासून वंचित राहत आहेत. त्यांना पारंपरिक कामासाठी योग्य असे प्रशिक्षण दिले जात नाही. त्यामुळे या योजनेचा मूळ उद्देश हाच की सर्व जातीच्या लोकांना योग्य प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःचा व्यवसाय सुरु करायला कमी व्याज दरात कर्ज उपलब्ध करून देणे. या जातीतील लोकांकडे व्यवसाय प्रशिक्षण घेण्यासाठी पैसे नसतात, परंतु हे जर पक्के कुशल कारागीर असतील तर त्यांना या योजेने अंतर्गत आर्थिक मदत केली जाते. यामुळे ते लोक आर्थिक सक्षम होऊन देशाच्या प्रगतीमध्ये आपले योगदान देऊ शकतात.

शिल्पकार, कारागीर यांना प्रमाणपत्र व ओळखपत्र दिले जाईल. ज्यामुळे यांना एक नवी ओळख मिळेल.

या योजनेमध्ये, विश्वकर्मा समाजाला योग्य प्रशिक्षण देऊन आर्थिक स्वरूपात मदत दिली जाते, त्यामुळे ते स्वतःसाठी रोजगार निर्माण करू शकतात.

कमीत कमी व्याजदारामध्ये कर्ज मिळवून दिले जाते. त्यामुळे ते स्वतःच्या व्यवसायात प्रगती करून आर्थिक सक्षम होतानाच देशाच्या अर्थव्यवस्थेत योगदान देतील.

या योजेने अंतर्गत शिल्पकार, कुशल कारागीर यांना बँकेशी जोडून त्यांना सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (MSME) मंत्रालयाशी जोडले जाते.

लाभ कोणाला मिळणार: |

लोहार, सोनार, चांभार, न्हावी, धोबी, टेलर, शिल्पकार, कारपेंटर, शेती अवजार निर्माते, माळी, झाडू, चटाई बनवणारे

अशा पारंपरिक जातींना, व्यावसायिकांना या योजनेचा लाभ मिळणार आहे .

आवश्यक कागदपत्रे:

वय अठरापेक्षा जास्त असल्याचा वयाचा पुरावा, आधार कार्ड,

मोबाईल नंबर, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र,

बँक पासबुक.

अर्ज ऑनलाईन करण्याची कार्यपद्धती:

सर्वात आधी तुम्हाला

pmvishwakarma.gov.in या अधिकृत वेबसाईटवर जावे लागेल. या वेबसाईट वर तुम्हांला अर्ज करा असे चिन्ह दिसेल. यावर तुम्ही क्लिक करा.

त्यानंतर तुम्ही आपला युजर आयडी व पासवर्ड टाकून सीएससी हे पोर्टल login करा.

सगळ्यात आधी तुमचा मोबाईल क्रमांक व आधार क्रमांक नंबर टाकून अकाऊंट व्हेरिफाईड करून समोर दिलेल्या माहितीनुसार अर्ज भरा.

काही आवश्यक कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करावी लागतील. नंतर पीएम विश्वकर्मा प्रमाणपत्र डाऊनलोड होईल. त्यावर एक डिजिटल आयडी येईल. तो पुढे उपयोगात येईल.

यानंतर login करून तुम्ही आपला मोबाईल नंबर टाकून नोंदणी करा.

आता मुख्य अर्ज खुला होईल, त्यामध्ये विविध माहिती अचूक भरून या योजनेसाठी अर्ज करू शकता. पुढची प्रक्रिया राज्यस्तरीय अधिकारी ऑनलाईन करतील.

शेळी पालन व्यवसाय :

शेतकरी हा शेतीसोबत पूरक व्यवसाय किंवा जोडधंदा म्हणून शेळी पालनाकडे उत्तम पर्याय म्हणून बघत असतो. त्यामुळे राज्यसरकारने ७५% अनुदानाची सवलत देऊन शेतकऱ्याला एक मदतीचा हात दिला आहे. राज्य व केंद्र सरकारच्या वतीने ही योजना राबविली जाते. भारत हा कृषिप्रधान देश असून भारतात खूप कुटुंबांचा उदरनिर्वाह हा केवळ शेती आणि पशुपालनावर आहे. संपूर्ण कुटुंब शेतीवर अवलंबून असणाऱ्या शेतकऱ्यांना पशुपालन करून चांगला लाभ होतो. शेळी पालन ही योजना खूप प्रसिद्ध आहे.

पण तेच शेळीपालन अजून प्रशिक्षण घेऊन जर केले तर खूप फायद्याचे ठरेल. महाराष्ट्रामध्ये बघितले तर गावरान शेळी पाळली जाते. पण आपण याकडे व्यावसायिक दृष्टीने बघितले पाहिजे. महाराष्ट्रामध्ये शेळीपालन करण्यासाठी हवामान अतिशय अनुकूल आहे. पात्रता असलेल्या शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी सहकारी, राष्ट्रीयीकृत बँका तसेच कृषी व ग्रामीण विकास संस्था देखील सहकार्य करीत आहेत. लोकांना शेळीपालन करण्यास प्रवृत्त करणे हे योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. खादी ग्रामोद्योग व संबधित संस्थांकडून शेळी पालन संबधित सर्व माहिती दिली जाते. शेळ्यांच्या जाती अनेक आहेत. पण कोणत्या जातीची निवड करावी, त्यांची वैशिष्टये, त्यांचा उत्तम आहार, त्यांना राहण्यासाठी शेड, त्यांना होणारे आजार, त्यांची काळजी कशी घ्यावी?,

लसीकरण किती कालावधीत करावे?, तसेच उपचाराविषयी अचूक माहिती मिळाल्यास तुम्ही उत्तमप्रकारे यशस्वी व्हाल, हा या योजनेचा हेतू आहे.

पात्रता आणि निकष:

लाभार्थ्याकडे प्रकल्प अहवाल आवश्यक असतो. त्यामध्ये विकत घेणाऱ्या शेळीची संभाव्य किंमत, घर खर्च आणि लाभांश दर्शविला जाणे आवश्यक असते.

१०० शेळ्यांसाठी ९ हजार जमीन चौ.मी. असावी. अर्ज करतांना,जमीन भाडयाची असेल तर त्याची पावती किंवा जागेचा नकाशा हवा. भाडेतत्तावर असेल तर त्याचा अपेक्षित भाडे खर्च याचा उल्लेख अहवाल असावा लागतो. जर शेतकरी कर्ज घेण्यास तयार असेल तर त्याच्याकडे १ लाख रुपयांचा धनादेश/पासबुक/एफडी किंवा कर्ज घेण्यासाठी इतर पुरावे किंवा तारण असायला हवे.

शेळी पालन योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे : आधार कार्ड, पॅन कार्ड, जात प्रमाणपत्र /दाखला,

रहिवाशी दाखला (सरपंच, ग्रामसेवक, तलाठी यांनी दिलेला), अर्जदाराचे नवीन पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, जागेचा उतारा, बँक पासबुक (आधारशी लिंक असणे अनिवार्य), प्रकल्प अहवाल, ७/१२ उतारा, मोबाईल क्रमांक. अर्ज ग्रामपंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद देत मिळू शकतो. अर्ज व्यवस्थित वाचून आवश्यक ती माहिती भरा. सर्व कागदपत्राची झेरोक्स त्याला जोडून संबधित अधिकाऱ्याकडून तो तपासून घेऊन सांगितलेल्या विभागाकडे जमा करावा.

अद्यायावत माहितीसाठी सरपंच, ग्रामसेवक तसेच जवळच्या तालुका पंचायत समितीमधील पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधावा.

शेळी पालन अनुदान किती:

राज्य व केंद्र सरकारमार्फत शेळीपालन योजना राबविली जाते. योजनेंतर्गत ५० हजार रू. ते १५ लाख रूपयांपर्यंत कर्ज मिळू शकते.

१. अनुसूचित जाती व जमाती यांच्यासाठी ७५% अनुदान.

२.सर्वसाधारण प्रवर्गातील व इतर मागासवर्गीय यांना ५०% अनुदान देण्यात येते.

शेळीपालन हा व्यवसाय खूपच फायदेशीर व्यवसाय आहे. कारण शेतीला पूरक व्यवसाय म्हणून शेळीपालनाकडे बघितले जाते. शेळीपासून मांस, दूध आणि मेंढी पासून लोकरही मिळते. मांसाची मागणी वाढल्यामुळे शेळी पालन व्यवसाय खूपच परवडणारा झाला आहे.

शेळीच्या दुधाचे प्रमाण हे त्यांच्या जातीनुसार बदलते. उदा.काठवाडी शेळी एका वेळी ३-४ लिटर दूध देते. गावरान शेळी साधरणपणे १५ महिन्यात २ वेळा करडाला जन्म देते. शेळीच्या जातीनुसार आणि त्यांच्या खान-पानानुसार हे बदल होत असतात.

जर चाऱ्याचे नियोजन चांगले असेल तर, आपण विविध प्रकारचे गवत लावून शेळ्यांना बंधिस्त करून पालन करू शकता. पण मोकळया रानात फिरवून जर आपण आणले तर शेळयांचे पाय मोकळे होऊन शेळ्या विविध वनस्पतीचा चारा खाऊ शकतात. यातून त्यांना कमी प्रमाणात आजार होत असतात. शेळी पालन बंदिस्त करावे की अर्ध बंधिस्त करावे हा निर्णय सर्वस्वी आपल्यावर अवलंबून आहे.

वेळेवर लसीकरण केले तर शेळ्यांना होणारे आजार टाळता येतात. त्यासाठी शेळयांना वेळी-वेळी लसीकरण करणे फायदेशीर ठरते.

या व्यवसायाला खूप कमी प्रमाणात जागा लागते. एका शेळीला कमीत-कमी २० चौरस फुट जागा लागते.

महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ :

महाराष्ट्रातील खादी व ग्रामोद्योगाच्या विकासासाठी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाची स्थापना केलेली आहे. ग्रामीण भागातील गरजू लोकांसाठी रोजगार निर्मितीच्या माध्यमातून ग्रामीण विकास करणे तसेच स्थानिक साधन संपत्तीचा वापर करून ग्रामीण भागातील कारागिरांना रोजगार मिळवून देणे हे या मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

अर्थसहाय्य योजना :

खादी ग्रामोद्योगाच्या विकासासाठी खादी ग्रामोद्योग आयोगाकडून वेगवेगळ्या उद्योगांसाठी ठरविलेल्या आकृतीबंधानुसार थेट अर्थसाह्य उपलब्ध करून दिले जात होते. त्यात नवीन आर्थिक धोरणानुसार बदल करण्यात आले आहेत. ग्रामोद्योगाच्या उभारणीसाठी मार्जिन मनीच्या स्वरूपात विविध बँकांच्या माध्यमातून अर्थसहाय्य देण्याचे धोरण आयोगाने अंगीकारले आहे. त्यानुसार मंडळ पुढील योजना राबवत आहे.

१) पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना :

२) मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना :

३) मध उद्योग/ मधमाशा पालन व पणन योजना : पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत उत्पादन प्रक्रिया उद्योगासाठी ५० लाख रुपयांपर्यंत तर सेवा उद्योगासाठी २० लाख रुपयांपर्यंत कर्ज मर्यादा आहे. पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत खादी ग्रामोद्योग मंडळ मार्फत देण्यात येणारे आर्थिक सहाय्य हे राष्ट्रीयकृत बँकेमार्फत देण्यात येते. यासाठी अर्ज http://kviconline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. आर्थिक मदतीचे स्वरूप :

सर्वसाधारण संवर्गातील लाभार्थ्यांना प्रकल्प किंमतीच्या १० टक्के स्वगुंतवणूक करावी लागेल. तर ९० टक्के बँक कर्ज उपलब्ध करून दिले जाईल. या १०० टक्के खर्चामध्ये ग्रामीण भागातील लाभार्थ्याला २५% व शहरी भागातील लाभार्थ्याला १५ टक्के अनुदान (मार्जिन मनी) खादी ग्रामोद्योग मंडळाकडून देण्याची व्यवस्था आहे.

अनुसूचित जाती,जमाती, अल्पसंख्यांक, इतर मागासवर्ग, महिला, माजी सैनिक, अपंग अशा राखीव संवर्गातील लाभार्थ्यांना प्रकल्प किंमतीच्या ५ टक्के स्वगुंतवणूक करावी लागेल. तर ९५ टक्के बँक कर्ज मिळू शकेल. यात ग्रामीण भागातील लाभार्थ्याला ३५ टक्के तर शहरी भागातील लाभार्थ्याला २५ टक्के अनुदान (मार्जिन मनी) मंडळामार्फत उपलब्ध करून दिले जाईल.

पात्रतेच्या अटी

उत्पादन प्रक्रिया असलेल्या प्रकल्पामध्ये १० लाख रुपयांपेक्षा जास्त खर्च असल्यास तसेच सेवा उद्योगांमध्ये प्रकल्प किंमत ५ लाख रुपये असेल तर किमान शैक्षणिक पात्रता इयत्ता ८ पास आवश्यक आहे. अर्जदाराचे किमान वय १८ वर्षे पूर्ण झालेले असावे. अर्जदाराने केंद्र अथवा राज्य शासनाच्या कोणत्याही योजनेमध्ये यापूर्वी अनुदान घेतलेले नसावे. *केवळ नवीन उद्योजक, कारागीर संस्था व बचत गट या योजनेचा लाभ घेण्यास पात्र राहतील.

आवश्यक कागदपत्रे : पासपोर्ट आकाराची अर्जदाराची छायाचित्रे, आधार कार्ड, शैक्षणिक दाखला, राखीव संवर्गासाठी जातीचे प्रमाणपत्र, ग्रामसेवकाचा त्या गावातील लोकसंख्येचा दाखला, प्रकल्प अहवाल.

संस्थेसाठी व बचत गटासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे : १९६० च्या कायद्यान्वये संस्था नोंदणी प्रमाणपत्र, संस्थेचा ठराव, संचालक मंडळाची यादी तसेच अध्यक्ष व सचिव यांची छायाचित्रे.

स्कोर कार्ड साठी लागणारी इतर आवश्यक कागदपत्रे : जागेचा उतारा किंवा कर पावतीची झेरॉक्स, शिधापत्रिका, रहिवासी दाखला, अनुभव अथवा प्रशिक्षण प्रमाणपत्र, घरातील उत्पन्नाचे इतर साधन, आयकर विवरणपत्र, विमा पावती, बँक पासबुक झेरॉक्स, संगणक ज्ञान प्रमाणपत्र झेरॉक्स, जीएसटी शॉप अॅक्ट पावती, परतफेडीची योजना, तयार माल खरेदी करण्यासाठी तयार असल्याबाबत खरेदीदाराचे संमतीपत्र, कच्चामाल व कामगार उपलब्धते बाबतचे पत्र, पॅन कार्ड झेरॉक्स, प्रकल्प अहवाल संपूर्ण अपलोड करावा. कर्ज परतफेडीचा कालावधी प्रकल्प अहवालात नमूद केल्याची प्रत इत्यादी कागदपत्रे अर्ज ऑनलाईन भरल्यानंतर अपलोड करायची आहेत.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम :

राज्यातील शहरी व ग्रामीण क्षेत्रातील सुशिक्षित युवक युवतींची वाढती संख्या व उद्योग व्यवसाय क्षेत्रात राज्यातील विविध क्षेत्रात उपलब्ध होत असलेल्या स्वयंरोजगार व रोजगाराच्या नवीन संधी विचारात घेऊन राज्याची महत्त्वाकांक्षी अशी स्वतंत्र मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजना सन २०१९-२० या आर्थिक वर्षापासून सुरू करण्यात आली आहे.

या योजनेचा अर्ज http://maha-cmegp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

आर्थिक मदतीचे स्वरूप व प्रकल्प मर्यादा :

उत्पादन प्रक्रिया उद्योगासाठी ५० लाख रुपये व सेवा उद्योगासाठी २० लाख रुपये प्रकल्प मर्यादा आहे. अनुसूचित जाती, जमाती, अल्पसंख्यांक, इतर मागासवर्ग, महिला, माजी सैनिक व अपंग अशा राखीव संवर्गासाठी ५ टक्के लाभार्थी स्वगुंतवणूक आहे. ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना ३५ टक्के, शहरी भागातील लाभार्थ्यांना २५% अनुदान (मार्जिन मनी) देय आहे. तर ग्रामीण भागातील लाभार्थ्याला ६० टक्के व शहरी भागातील लाभार्थ्याला ७० टक्के बँक कर्ज मिळू शकते. खुल्या व इतर प्रवर्गासाठी १० टक्के लाभार्थी स्वगुंतवणूक करावी लागते. ग्रामीण भागातील लाभार्थ्याला २५ टक्के व शहरी भागातील लाभार्थ्यास १५% अनुदान (मार्जिन मनी) देय आहे. तर ग्रामीण भागातील लाभार्थ्यास ६५ टक्के व शहरी भागातील लाभार्थ्यास ७५% बँक कर्ज मिळू शकते.

अर्जदाराच्या पात्रता : अर्जदाराचे किमान वय १८ व कमाल वय ४५ वर्ष आवश्यक आहे. अनुसूचित जाती, जमाती, महिला, ओबीसी, अपंग, माजी सैनिक यांच्यासाठी वयोमर्यादित ५ वर्ष शिथीलता आहे. अर्जदाराने यापूर्वी शासनाच्या कोणत्याही योजनेत अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा. *केवळ नवीन उद्योजक कारागीर संस्था व बचत गट योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहे.

दहा लाखांवरील प्रकल्पासाठी सातवी उत्तीर्ण व २५ लाख रुपयांवरील प्रकल्पासाठी दहावी उत्तीर्ण शैक्षणिक पात्रता आहे. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला योजनेचा लाभ घेता येईल. कुटुंबाची व्याख्या ही पती-पत्नी अशी असेल.

या योजनेतून कर्ज मंजूर केल्यानंतर मान्यताप्राप्त संस्थेकडून ईडीपी प्रशिक्षण उत्पादन प्रवर्गातील उद्योगासाठी दोन आठवडे मदतीचे तसेच सेवा व कृषी पूरक उद्योगासाठी एक आठवडे मुदतीचे प्रशिक्षण असेल.

वैयक्तिक प्रकरणासाठी आवश्यक कागदपत्रे : अर्जदाराची छायाचित्रे, आधार कार्ड, शैक्षणिक दाखला, रहिवासी प्रमाणपत्र, राखीव संवर्गासाठी जातीचे प्रमाणपत्र, ग्रामसेवकाचा लोकसंख्येचा दाखला, प्रकल्प अहवाल, विहीत नमुन्यातील इंग्रजीतील अंडरटेकिंग फॉर्म, पॅन कार्ड, गुणपत्रिका.

संस्थेसाठी व बचत गटासाठी आवश्यक कागदपत्रे :

१९६० कायद्यान्वये संस्था नोंदणी प्रमाणपत्र, संस्थेचा ठराव, संचालक मंडळाची यादी, अध्यक्ष व सचिव यांची छायाचित्रे.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत कर्ज प्रस्ताव जिल्हा कार्य गट समितीच्या मंजुरीने संबंधित बँकांकडे कर्ज मंजुरीसाठी शिफारस करण्यात येते सरकारी बँका जिल्हा सहकारी बँका खाजगी क्षेत्रातील शेड्युल बँका या योजनेसाठी सहयोगी संस्था म्हणून कार्यरत आहे.

मध उद्योग :

मधाचा अन्न व औषध म्हणून अनादी काळापासून उपयोग होत आला आहे. मधाचे पोळ जाळून, पिळून मध गोळा करण्याच्या परंपरागत पद्धतीमुळे मधमाशांचा व त्यांच्या पोळ्यांचा नाश होतो. तसेच चांगल्या प्रतीचा मध मिळू शकत नाही. महाराष्ट्रातील पहिले मधमाशा पालन केंद्र महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाने महाबळेश्वर

येथे सुरू केलेले आहे. या ठिकाणी आधुनिक संशोधन केल्यामुळे मधमाशा व त्यांच्या पोळांचा नाश न होता पोळे पुन्हा वापरता येतात. यामुळे पोळे बांधण्यासाठी मधमाशांचा खर्च होणारा वेळ, श्रम व अन्न यांची बचत होते. फक्त पेटीतून मध काढल्यामुळे उच्च प्रतीचा शुद्ध व अहिंसक मध मिळतो. राज्याच्या सर्व भागातील, प्रामुख्याने डोंगराळ व जंगली विभागातील मधपाळांना उत्पादनाचे साधन उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खादी ग्रामोद्योग मंडळाने मध उद्योग विकास कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यासाठी मंडळाच्या वतीने मधमाशा पालन उद्योगाचे प्रशिक्षण सुरू करण्यात आले आहे. सवलतीच्या दरात मध पेट्यांचा, मध यंत्रांचा पुरवठा करण्यात येतो. या उद्योगांतर्गत उत्पादन, संशोधन, मदत प्रक्रिया, विक्री, राणीमाशी पैदास इत्यादी कार्यक्रम मंडळामार्फत राबविण्यात येतात. तसेच मधपाळाने उत्पादित केलेले मध खरेदी करून तो "मधुबन" या ब्रँडने विक्री केला जातो.
मधमाशा पालन उद्योगाची वैशिष्ट्ये :

१. पर्यावरण पूरक उद्योग.

२. जागा, इमारत, वीज, पाणी यासाठी गुंतवणूक नाही.

३. पूर्णपणे देशी तंत्रज्ञान.

४. चार लहानपणापासून थोरांपर्यंत सर्वांना करता येणारा उद्योग.

५. शेती व फळ बागायती पूरक व इतर कोणत्याही उद्योगांशी स्पर्धा नाही.

६. रोजगार निर्मितीचा उत्तम पर्याय आहे.

७. वाया जाणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीचा चांगला उपयोग होतो.

८. मधमाशांच्या शिस्तबद्ध जीवनापासून बरेच काही शिकता येते.

मधमाशापालन उद्योगाचे फायदे :

१. शुद्ध मधाचे उत्पादन.

२. शुद्ध मेणाचे उत्पादन.

३. परागीभवनामुळे शेती व फळबागायती पिकाच्या उत्पादनात वाढ होते.

४. पराग मधमाशांचे विष संकलन केले जाते.

५. रॉयल जेली संकलन.

६. मधमाशांचे संरक्षण व संवर्धन.

७. पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत होते.

मध केंद्र योजना : महाराष्ट्र सरकारने दिनांक १८ जून २०१९ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे संपूर्ण राज्यात मध केंद्र योजना राबविण्यास मान्यता दिलेली आहे.

अ) प्रगतशील मधपाळ व प्रशिक्षण (केंद्र चालक):* प्रगतशील मधपाळ प्रशिक्षण केंद्र चालक, मधपाळ संस्थेचा सभासद किंवा कर्मचारी यांना मंडळातर्फे महाबळेश्वर येथील मध संचालनालयात २० दिवसांचे निवासी प्रशिक्षण दिले जाते. *ब) मधपाळ प्रशिक्षण:* वैयक्तिक शेतकरी/अर्जदार यांना मध संचालनालयामार्फत किंवा संचालनालय ठरवेल त्या संस्था/ व्यक्तिमार्फत दहा दिवसांचे निवासी प्रशिक्षण दिले जाते.

क) मधमाशा पालन छंद प्रशिक्षण:* शेतकरी, शाळा, महाविद्यालय, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, शासकीय सेवेतील अधिकारी, कर्मचारी यांना मधमाशा पालन एक छंद म्हणून ५ दिवस मुदतीचे छंद प्रशिक्षण देण्यात येते. तसेच शासनाच्या कृषी विभागाच्या आत्मा व वनविभागाच्या योजना अंतर्गत मंडळामार्फत स्थानिक ठिकाणी प्रशिक्षण देण्याची व्यवस्था आहे. *मधमाशा पालन अर्थसहाय्य* प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांना मधमाशा पालन उद्योगासाठी लागणाऱ्या मधपेट्या व इतर साहित्याच्या स्वरूपात ५० टक्के अनुदान देण्यात येत आहे उर्वरित ५० टक्के स्वगुंतवणूक लाभार्थ्यांनी करणे आवश्यक आहे. मध खरेदी केंद्र चालक व मधपाळ हे मधमाशा पालक उद्योजकांनी उत्पादित केलेले मध संचालनालयामार्फत हमीभावाने खरेदी केले जाते.

अर्जदाराची पात्रता :

मधपाळासाठी अर्जदार साक्षर असावा. १८वर्षांपेक्षा जास्त वय असावे. किमान १ एकर शेत जमीन स्वमालकीची किंवा कुटुंबातील इतर व्यक्तीच्या मालकीची असावी.

प्रगतशील मधपाळसाठी किमान दहावी उत्तीर्ण असावा. वय २१ वर्षांपेक्षा अधिक असावे. किमान १ एकर शेत जमीन स्व मालकीची किंवा भाडे कराराची आवश्यक आहे.

खादी ग्रामोद्योग मंडळाच्या कक्षेत येणारे इतर उद्योग :

१) कृषी व अन्न प्रक्रिया उद्योग : धान्य दाळी, मसाले तयार करणे, शेवया तयार करणे, पीठ, तांदूळ गिरणी, तेल घाणी उद्योग, ताड निरा, आणि अन्य उद्योग, गुळ खांडसरी उद्योग, भारतीय मिठाई तयार करणे, रसवंती, मधमाशा पालन, फळ व भाजी प्रक्रिया, लोणची, पापड तयार करणे, तरटी, चटाया व हार तयार करणे, औषधी वनस्पती संकलन, काजू प्रक्रिया, द्रोण व पत्रावळी तयार करणे, दुग्धजन्य पदार्थ बनविणे, पशु चारा व कुक्कुट खाद्य बनविणे, मका व रागी वरील प्रक्रिया.

२) वस्त्रोद्योग : लोकवस्त्र तयार करणे, होजियरी, शिवणकाम व तयार कपडे, कापडावरील नक्षीकाम, वैद्यकीय पट्ट्या बनविणे, खेळणी व बाहुल्या बनविणे, भरतकाम इत्यादी. इलेक्ट्रॉनिक वस्तूंची देखभाल, डिझेल इंजिन व पंप दुरुस्ती, टायर दुरुस्ती.

३) सेवा उद्योग : कपडे धुलाई, केस कर्तन (सलून), नळकाम (प्लंबिंग), विद्युत कीटकनाशक व फवारे यांच्या पंप सेटची दुरुस्ती, मंडप डेकोरेशन, लाऊड स्पीकर/ ध्वनीवर्धक यंत्र भाड्याने देणे, बॅटरी चार्जिंग,कलात्मक फलक रंगविणे, सायकल दुरुस्ती दुकान, गवंडी काम, मद्यविरहित ढाबा, चहा स्टॉल, बँड पथक, मांस, मच्छी, पशुपालन, वराहपालन, कुक्कुटपालन इत्यादी.

४) वनसंपत्तीवर आधारित उद्योग : हात कागद उद्योग, वह्या, रजिस्टर, लिफाफे इत्यादी लेखन सामग्री तयार करणे, काथ तयार करणे, गोंद (डिंक) तयार करणे, आगपेटी व उदबत्ती तयार करणे, बांबू व वेत उद्योग, कागद प्लेट व कागदाची उत्पादने, खस ताटी व झाडू निर्मिती, पाम, फोटो फ्रेम तयार करणे, तागापासून वस्तू तयार करणे.

५) खनिज आधारित उद्योग : कुंभार उद्योग, चुना उद्योग, दगड फोडणे, नक्षीकाम करणे व दगडापासून वस्तू तयार करणे, पाटी, पेन्सिल व प्लास्टर ऑफ पॅरिसपासून वस्तू तयार करणे, सरपणापासून कोळसा तयार करणे, भांडी साफ करण्याची पावडर तयार करणे, सोने-चांदी, दगड आणि कृत्रिम घासून दागिने तयार करणे, गुलाल, रांगोळी तयार करणे, लाखेच्या बांगड्या तयार करणे, रंग, वॉरनिश, डिस्टेंपर तयार करणे, काचेची खेळणी तयार करणे, सजावटी काच कापणे, काच डिझाईनिंग व पॉलिश करणे, रत्न कटाई करणे.

६) ग्रामीण अभियांत्रिकी तसेच अपारंपारिक उद्योग : सुतार, लोहार काम, अॅल्युमिनियम उद्योग, गोबरगॅस प्लांट तयार करणे, गांडूळ खत निर्मिती करणे, कागद पिन, क्लिप, सेफ्टी पिन इत्यादी तयार करणे, शोभेचे बल्ब, बाटल्या तयार करणे, छत्रीची जोडणी व उत्पादन करणे, सूर्य तथा वायु ऊर्जा उपकरणे बनविणे, संगीतवाद्य तयार करणे, पितळ तांबे व कासे यापासून भांडी तयार करणे, रेडिओ व कॅसेट प्लेयर तयार करणे, स्टॅबिलायझर तयार करणे, इलेक्ट्रॉनिक घड्याळ आणि अलार्म घड्याळ तयार करणे, लाकडावर कोरीव काम करणे, कलात्मक फर्निचर तयार करणे, मोटार वाइंडिंग, तारेच्या जाळी निर्मिती करणे, लाकडावर कोरीव काम करणे, कलात्मक फर्निचर तयार करणे, ग्रामीण वाहन बैलगाडी, नाव, दुचाकी, सायकल, रिक्षा इत्यादी तयार करणे.

७) पॉलिमर व रसायनांवर आधारित उद्योग : ग्रामीण चर्मोद्योग, अखाद्यतेल व साबण उद्योग, रबराच्या वस्तूंची निर्मिती, रेक्झिनपासून वस्तू, पीव्हीसी इत्यादी. हस्तिदंत, शिंगे व हाडे यापासून वस्तू तयार करणे, टिकल्या, बिंदी बनविणे, मेहंदी तयार करणे, सुगंधी तेल तयार करणे, शाम्पू तयार करणे, केस तेल निर्मिती, कपडे धुण्याचा साबण व पावडर तयार करणे, मेणबत्ती, खडू, कापूर तयार करणे.

अधिक माहितीसाठी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी तथा तालुका ग्रामोद्योग अधिकारी अथवा तालुका खादी ग्रामोद्योग मंडळाचे कार्यालय येथे योजना व अनुदानाबाबत अधिक माहिती मिळू शकेल.

गाई/म्हशींचे गट वाटप योजना :

राज्यात दूध उत्पादनास चालना देण्यासाठी सहा/ चार/ दोन दुधाळ संकरीत गाई/ म्हशींचे गट वाटप करणे या नाविन्यपूर्ण राज्यस्तरीय सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व जिल्हास्तरीय आदिवासी क्षेत्र उपयोजनांचे यापूर्वीचे शासन निर्णय अधिक्रमित करून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

राज्यात दुग्धोत्पादनास चालना देण्यासाठी राज्यस्तरीय सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना व जिल्हास्तरीय आदिवासी क्षेत्र उपयोजने अंतर्गत वाटप करावयाच्या सहा/चार/ दोन संकरीत गाई/ म्हशींचे गट वाटप करणे या योजनेत

गीर, सहिवाल, रेड सिंधी, राठी, थारपारकर, देवणी, लाल कंधारी, गवळाऊ, डांगी इत्यादी दुधाळ जातीच्या गायींचा समावेश आहे.

योजनेचे स्वरूप :

योजनेत समाविष्ट असलेल्या गाय या योजनेअंतर्गत वाटप करावयाच्या दुधाळ संकरित गाई जसे की :

एचएफ (प्रतिदिन १० ते १२ लि. दुध उत्पादन क्षमता)

जर्सी (प्रतिदिन १० ते १२ लि. दुध उत्पादन क्षमता)

गीर (प्रतिदिन ८ ते १० लि. दुध उत्पादन क्षमता)

सहिवाल (प्रतिदिन ८ ते १० लि. दुध उत्पादन क्षमता)

रेड सिंधी (प्रतिदिन ८ ते १० लि. दुध उत्पादन क्षमता)

राठी (प्रतिदिन ८ ते १० लि. दुध उत्पादन क्षमता)

थारपारकर (प्रतिदिन ८ ते १० लि. दूध उत्पादन क्षमता)

देवणी (प्रतिदिन ८ ते १० लिटर दूध उत्पादन क्षमता)

लाल कंधारी (प्रतिदिन ८ ते १० लिटर दूध उत्पादन क्षमता)

गवळाऊ (प्रतिदिन ५ ते ७ लिटर दूध उत्पादन क्षमता)

डांगी (प्रतिदिन ५ ते ७ लिटर दूध उत्पादन क्षमता)

सुधारित मुऱ्हा व जाफराबादी म्हशी (प्रतिदिन ८ ते १० लि. दूध उत्पादन क्षमता) दुसऱ्या/ तिसऱ्या वेतातील असाव्यात. दुधाळ गाई व म्हशी शक्यतो १ ते २ महिन्यापूर्वी व्यायलेल्या असाव्यात.

अनुदानाची टक्केवारी:

सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थींना ६/४/२ दुधाळ जनावरांचा एक गट वाटप करतांना ५० टक्के तर, अनुसूचित जाती/ जमातीच्या लाभार्थींना ७५ टक्के शासकीय अनुदान अनुज्ञेय राहील.

खुल्या प्रवर्गातील लाभार्थ्यांना अनुदानाव्यतिरिक्त उर्वरित ५० टक्के रक्कम तसेच, अनुसूचित जाती/ जमातीच्या लाभार्थ्यांना अनुदान व्यतिरिक्त उर्वरित २५ टक्के रक्कम स्वत: अथवा बँक/ वित्तीय संस्थेकडून कर्ज रुपाने उभारावी लागेल.

कर्ज हिस्सा :

बँक/ वित्तीय संस्थेकडून कर्ज घेणाऱ्या (खुल्या प्रवर्गासाठी १० टक्के लाभार्थी हिस्सा व ४० टक्के बँकेचे कर्ज व अनुसूचित जाती/ जमातीसाठी ५ टक्के लाभार्थी हिस्सा व २० टक्के बँकेचे कर्ज) लाभार्थ्यांना या योजने अंतर्गत प्राधान्य देण्यात येते.

लाभार्थी निवड व पात्रता :

सर्वसाधारण प्रवर्गातील तसेच अनुसूचित जाती/ जमातीच्या लाभार्थ्यांची निवड खालील घटकांवरून उतरत्या प्राधान्यक्रमाने केली जाते.

महिला बचत गटातील लाभार्थी

अल्प भूधारक शेतकरी (१ ते २ हेक्टर पर्यंतचे भूधारक)

सुशिक्षित बेरोजगार (रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात नोंद असलेले)

साधारणपणे गाय म्हशी गट वाटप योजनेची लाभार्थी निवड पात्रता दिलेली आहे. त्याप्रमाणे निवड केली जाते.

गाई/म्हैस योजनेचा लाभ:

या योजनेअंतर्गत सहा संकरित गाई/ म्हशींच्या एका गटाची किंमत ३ लाख ३५ हजार १८४ रू. इतकी निश्चित करण्यात आली आहे. , त्यामध्ये खालील बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

अ.क्र. बाब : किंमत रुपये

- सहा संकरित गाई/ म्हशींचा गट प्रति गाय/ म्हैस ४० हजार रू. प्रमाणे —- २ लाग ४० हजार रू.
- जनावरांसाठी गोठा —३० हजार रू.
- स्वयंचलित चारा कटाई यंत्र —- २५हजार रू.
- खाद्य साठविण्यासाठी शेड २५ हजार रू.
- ५.७५ टक्के (+१०.०३ % सेवाकर) दराने तीन वर्षांचा विमा —- १५ हजार १८४ रू.

एकूण:- ३ लाख ३५ हजार १८४ रू.

वरीलप्रमाणे या योजनेअंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थींना गटवाटप करताना ५० टक्के अनुदान म्हणजेच १ लाख ६७ हजार ५९२ रू., तर अनुसूचित जाती/ जमातींच्या लाभार्थींना ७५ टक्के अनुदान म्हणजेच २ लाख ५१ हजार ३८८रू. शासकीय अनुदान अनुज्ञेय आहे. गाय म्हैस अनुदान योजनेअंतर्गत ३ वर्षाचा विमा यामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे.

लाभार्थी निवड प्रकिया :

लाभार्थी निवड प्रक्रिया लाभार्थी निवड समिती व पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या मार्फत होईल.

योजनेचा अर्ज सादर कुठे करावा : योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज पशुवैद्यकीय दवाखान्यात सादर करावयाचा आहे.

महिलांकडे कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत ?

कागदपत्राचे नाव	कोणत्या कार्यालयात मिळते ?	त्यासाठी कोणती कागदपत्र द्यावी लागतात
रेशनकार्ड		
उत्पन्न प्रमाणपत्र		
जातीचा दाखला		
सातबारा उतारा		
वारस प्रमाणपत्र		
बँक खाते		
रहिवासी दाखला		